रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १२२
www.ramprahar.com

सोमवार, १८ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## ‘काँग्रेस आघाडी समस्या, तर भाजप महायुती समाधान’



**पिंपरी-चिंचवड :** काँग्रेस सत्ताकाळात पाकिस्तान भारतात घुसखोरी व दहशतवादी हल्ले करीत होता, मात्र आता पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या काळात नवा भारत आहे. नवा भारत म्हणजे ‘हम छेडेंगे नहीं लेकीन हमें छेडेंगे तो छोडेंगे नहीं’ असा संदेश जगभरात गेला आहे. हा नवा भारत घुसखोरी कराल, तर घुसून मारण्याची हिंमत ठेवतो. देशाच्या समस्येचे कारण काँग्रेस आघाडी आहे, तर समस्यांवरील समाधान भाजप महायुती आहे, असा घणाघात उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केला. भोसरी येथे आदित्यनाथ यांची रविवारी (दि. १७) विराट सभा झाली. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी त्यांनी सबका साथ सबका विकास या भावनेतून देशाची प्रगती सुरू आहे, असेही सांगितले.

## अंतरंग

रायगडात २६८० मतदारांनी बजावला गृहमतदानाचा हक्क/३
माणगावमध्ये राजाभाऊ ठाकूर यांची प्रचार सभा/५
महाराष्ट्र ओपन कॅरम चॅलेंजर्स स्पर्धेत १० लाखांची बक्षिसे/८



# आमदार थोरवे सर्वसामान्यांना बळ देणारा कार्यकर्ता -खासदार बारणे

**खोपोली : प्रतिनिधी**



कर्जत खालापूर तालुक्यातील सर्वसामान्यांना बळ देण्याचे त्याचप्रमाणे त्याला मदत करण्याचे काम आमदार महेंद्र थोरवे यांनी केले आहे, असे प्रतिपादन मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी खोपोली येथे केले.

ते म्हणाले की, या मतदारसंघात यापूर्वी किती आमदार आले, परंतु महेंद्र थोरवे यांनी सर्वांत जास्त निधी आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न थोरवे केले आहे. गेल्या पाच वर्षांत अडीच वर्ष करुणाकळात गेले व उरलेले अडीच वर्षाचा कालावधी हा कमी पडला असून, त्यासाठी या मतदारसंघात प्रामाणिक काम करणाऱ्या उमेदवार महेंद्र थोरवे यांना पुन्हा विधानसभेवर पाठविणे ही आता मतदारांची जबाबदारी आहे.

महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रचारासाठी डा. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या प्रांगणात कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी श्रीरंग बारणे यांनी विचार मांडताना थोरवे यांना विजयी करण्याच आवाहन केले. या वेळी व्यासपीठावर महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र थोरवे, भाजप महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष अश्विनीताई पाटील, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, रिपब्लिकन पार्टी आठवले गटाच्या जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, प्रमोद महाडिक, जिल्हा परिषद माजी सभापती नरेश पाटील, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते उल्हास भुरके, हनुमंत पिंगळे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते यशवंत साबळे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष भाई शिंदे, याप्रमाणे शिवसेना भाजप रिपब्लिकन पार्टीचे वरिष्ठ पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र थोरवे यांनी बोलतात विरोधकांवर शरसंधान साधले, विरोधकांकडे कसलाही मुद्दा नसल्याने केवळ निगेटिव्ह वातावरण पसरवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असल्याने मतदारांनी अशा लोकांकडे दुर्लक्ष करावे असे सांगितले. शासनाच्या माध्यमातून व तुमच्या सहकार्याने या मतदारसंघाचा विकास प्रामाणिकपणे केला त्याला जनतेतून उस्फूर्त प्रतिसाद मिळत असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज या पुतळ्याच्या परिसराच्या सुशोभीकरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. या मतदारसंघाचा शाश्वत विकास व्हावा यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले, आतापर्यंत एकूण २९०० कोटीचा निधी आतापर्यंत या मतदारसंघासाठी आणण्यात यशस्वी झाल्याचे त्यांनी सांगितले. या शहराच्या विकासासाठी खूप कामे आतापर्यंत करावयाची आहेत त्यासाठी खोपोलीकरांचा पाठिंबा मिळेलच असा विश्वास आहे त्यांनी या वेळी व्यक्त केला.

प्रारंभी मान्यवरांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. माजी नगराध्यक्ष डॉक्टर सुनील पाटील यांनी प्रास्ताविक करताना आमदार महेंद्र थोरवे यांनी मतदारसंघात केलेल्या विकास कामाबद्दल माहिती देताना अशा प्रामाणिक उमेदवाराला निवडून देण्याबाबत आव्हान केले. या वेळी भाजप सरचिटणीस दीपक बेहेरे यांनीही आगामी काळात विधानसभेवर महायुतीची सत्ता येईल, यासाठी महेंद्र थोरवे यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

उमेदवार महेंद्र थोरवे यांना मातंग समाजाचा त्याचप्रमाणे रिक्षा संघटनेने ही आपला पाठिंबा लेखी पत्र देऊन घोषित केला. या कॉर्नर सभेचे सूत्रसंचालन माजी नगरसेवक संतोष माळकर व अमोल पाटील यांनी केले, प्रारंभी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी बाईक रॅली काढून शक्ती प्रदर्शन केले.

# आचारसंहिता उल्लंघनाबाबत योग्य कार्यवाही करा–जिल्हाधिकारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघात मतदानाबाबत आवश्यक तयारी झाली असून मतदानपूर्व काळात आदर्श आचासंहितेचे योग्य पालन होण्यासाठी सर्व यंत्रणांनी योग्य कार्यवाही करावी. कोणत्याही प्रकारे आचारसंहिता उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. उल्लंघन झाल्यास तत्काळ गुन्हे नोंदवावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात मतदान पूर्व ७२ तासांत करावयाच्या कारवाईच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला सर्व निवडणूक निरीक्षक रुही खान, ज्योती मीना, स्वप्नील ममगाई, संतोष कुमार, दुलीचंद राणा, सतीश कुमार, पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांसह वरिष्ठ अधिकारी, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते.

जावळे यांनी सांगितले कत, शेवटचे ७२ तास, ४८ तास या कालावधीत आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आचारसंहिता पालन करावे. यामध्ये कुठलीही हलगर्जी होता कामा नये. कुठेही अनियमितता दिसता कामा नये. स्थिर, फिरत्या पथकांची आवश्यकता वाटल्यास त्यांच्या नेमणुका सुरू ठेवाव्यात. आचारसंहितेचे उल्लंघन होता कामा नये असे निर्देश त्यांनी बैठकीत दिले.

शेवटच्या कालावधीत प्रचार होत असताना होणारे आचारसंहितेचे उल्लंघन रोखण्यासाठी विशेष लक्ष देवून जबाबदारी पार पाडावी. कुठेही जाहिर प्रचार सुरू राहता कामा नये. भरारी पथकांनी चांगल्या प्रकारे सनियंत्रण करून अशा प्रचारावर बारीक लक्ष ठेवा. स्थिर पथकांनीही चांगल्या प्रकारे क्टीव राहून कामे करावे अशा सूचना जिल्हाधिकारी जावळे यांनी दिल्या.

मतदान केंद्राच्या बाहेर २०० मीटर त्रिज्येमध्ये उमेदवारांचे निवडणूक बूथ उभारण्यात येऊ नयेत. एकाच इमारतीत किंवा आवारामध्ये अनेक मतदान केंद्रे असल्यास अशा सर्व मतदान केंद्राकरिता मिळून केवळ एक निवडणूक बूथ प्रत्येक उमेदवाराकरिता २०० मीटर त्रिज्येच्या बाहेर उभारता येईल. निवडणूक बूथ उभारण्याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी, आवश्यकते नुसार शासकीय प्राधिकरणे तसेच स्थानिक प्राधिकरणे यांच्या परवानग्या घेणे आवश्यक राहिल. निवडणूक बूथ उभारल्यामुळे सार्वजनिक किंवा खासगी मालमत्तेचे अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घ्यावी. बूथ धार्मिक जागेमध्ये किंवा परिसरात उभारण्यात येऊ नये. निवडणूक बूथ शैक्षणिक संस्था किंवा रुग्णालयाच्या परिसरात उभारण्यात येऊ नये. अशा निवडणूक बूथवर पक्षाचा ध्वज आणि पक्षाचे चिन्ह लावता येणार नाही असेही श्री जावळे यांनी या वेळी सांगितले.

निवडणूक बूथवर उपस्थित व्यक्तींकडून मतदानाकरिता येणाऱ्या मतदारांना कोणताही अडथळा किंवा प्रभाव होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. मतदान केंद्रापासून २०० मि. परिसरात कोणताही प्रचार अनुज्ञेय नाही. या वेळी पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी कायदा व सुव्यावस्थेच्या संदर्भात केलेल्या तयारीचा अहवाल सादर केला.



## आज सायंकाळनंतर शांतता कालावधी

***२० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी प्रचाराचा शांतता कालावधी मतदान संपण्यापूर्वी ४८ तास म्हणजेच सोमवारी १८ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजेपासून सुरू होत आहे. या कालावधीत दृकश्राव्य माध्यमे (टेलिव्हिजन, केबल नेटवर्क, रेडिओ, सोशल मीडिया) यावर शांतता कालावधीत मतदारांवर प्रभाव पाडणाऱ्या तसेच निवडणुकीच्या निकालावर परिणाम करू शकणाऱ्या बाबी प्रदर्शित करण्यास मनाई आहे.***

## निवडक

### विक्रांत कुबल यांची नियुक्ती



**मुरूड :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिवसहकार सेनेच्या मुरुड तालुका संघटकपदी नांदगावच्या विक्रांत विनय कुबल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विक्रांत कुबल हे नांदगाव ग्रामपंचायतीचे सदस्य असून शिवसेना उबाठा गटाचे युवासेना तालुका अधिकारी आहेत. त्यांच्या या नियुक्तीबद्दल शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे उपप्रमुख प्रशांत मिसाळ, शिवसेना तालुकाप्रमुख नौशाद दळवी, सेनेचे मुरुड तालुक्यातील ज्येष्ठ नेते प्रमोद भायदे, आदेश दांडेकर आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### जागतिक प्रीमॅच्युरिटी डे साजरा

**नवी मुंबई :** मेडीकवर हॉस्पिटलने जागतिक प्रीमॅच्युरिटी दिनानिमित्त विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात जनजागृतीपर सत्र आणि मुदतपूर्व जन्माच्या प्रवासाचा अनुभव घेतलेल्या कुटुंबांकडून त्यांच्या प्रवासाविषयी जाणून घेण्यात आले. अकाली प्रसुतीविषयी जागरूकता वाढवणे, नवजात बालकांच्या काळजी कशी घ्यावी याबाबत जागरुकता आणि या कुटुंबांना जोडण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यानिमित्ताने बेबी फूटप्रिंट ऑफ करेजचे अनावरण करण्यात आले. अकाली जन्माचे गंभीर स्वरूप ओळखून आणि या लहान योध्यांचा सन्मान करण्यासाठी मेडिकवर हॉस्पिटलने विविध उपक्रमांचे आयोजन केल्याची माहिती डॉ. तनमेश कुमार साहू (बालरग व नवजात शिशु तज्ज्ञ) यांनी दिली.

# आरोग्यासाठी धावल्या ग्रामीण भागातील महिला
## सुधागडातील महागाव येथे पिंकथॉन स्पर्धा उत्साहात

**पाली : प्रतिनिधी**

रॉनी स्क्रूवाला व झरीना स्क्रूवाला यांच्या स्वदेस फाउंडेशनच्या वतीने पिंकथॉन रन फॉर रूरल हेल्थ ही पहिली पिंकथॉन झाली. सुधागड तालुक्यातील महागाव ग्रामपंचायत हद्दीतील कवेलेवाडी ते देऊळवाडी या ठिकाणी १५० हून अधिक स्थानिक महिलांनी २ किलोमीटर धावल्या. या पिंकथॉन मध्ये मिलिंद सोमण व त्यांची पत्नी अंकिता कोणवर सहभागी झाले होते.



ग्रामीण महिलांना त्यांच्या आरोग्य आणि फिटनेसला प्राधान्य देण्याच्या उद्देशाने ही एक वार्षिक उपक्रमाची सुरुवात होती. यावेळी स्वदेस फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे आणि पिंकथॉनचे संस्थापक अभिनेते मिलिंद सोमण यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी महिलांना त्यांच्या आरोग्याबद्दल जागरूकतेसाठी प्रेरित केले.विशेषत: ग्रामीण भागांमध्ये आरोग्यसेवा मर्यादित असलेल्या ठिकाणी फिटनेस आणि आरोग्य जागरूकतेचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात स्वयम् चॅरिटेबल ट्रस्टच्या डॉ. चित्रलेखा कळंबे यांच्या अत्यंत माहितीपूर्ण कर्करोग जागरूकता सत्राने झाली. त्यांनी स्तनाचा कर्करोगाच्या लवकर निदानाचे महत्त्व स्पष्ट केले आणि महिलांना स्तनाचा कर्करोग बाबतच्या जागरूकतेविषयी अत्यंत महत्त्वाची माहिती दिली. यानंतर मिलिंद सोमण व त्यांची पत्नी अंकिता कोणवर यांनी दोन किलोमीटर धावण्याची सुरुवात केली. ज्यामध्ये स्थानिक महिलांना त्यांनी प्रेरणा दिली की फिटनेस हीच त्यांच्या समग्र आरोग्याची आधारशिला असावी. फिटनेस फक्त धावण्याबद्दल नाही, तर आपल्या दैनंदिन जीवनात साध्या सवयींमुळे आपल्या आरोग्यात चांगले बदल होऊ शकतात. असे मिलिंद सोमण यांनी या वेळी सांगितले.

या कार्यक्रमानंतर, सर्व सहभागी महिलांना पदके आणि स्तनाचा कर्करोग जागरूकता साहित्य देण्यात आले. कार्यक्रमामध्ये स्वदेस मित्र सिद्धेश्वर आदिवासीवाडी आसिका पवार, घोटावडे कासारवाडी पारू हिरवे व नवघर कासारवाडी नंदिनी जाधव यांनी महिलांच्या आरोग्याबद्दल आपले विचार व्यक्त केले.

कार्यकम यशस्वी करण्यासाठी कवेलेवाडी ते देऊळवाडी गावविकास समिती व स्वदेस फाउंडेशन टीमने विशेष परिश्रम घेतले. शेवटी आभार स्वदेस फाउंडेशन संचालक प्रदीप साठे यांनी मानले.

> **स्वदेस फाउंडेशनसोबत या उपक्रमात भाग घेतल्याने मी अत्यंत आनंदित आहे. लवकर निदान आणि ओरल कैंसर, सर्वाइकल कैंसर आणि स्तनाच्या कर्करोगबाबत जागरूकता निर्माण करणे हे खूप महत्त्वाचे आहे. ज्यामुळे ग्रामीण महिलांना त्यांच्या आरोग्याबद्दल सजग करणे आणि त्यांच्या जीवनाचा दर्जा सुधारण्याचा मार्ग मोकळा होईल.**
>
> **–मिलिंद सोमण, अभिनेता व मॉडेल**

# चोरीप्रकरणी एकास अटक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौलमधील प्रसिध्द पद्मावती व मल्लेश्वर मंदिरातील पितळी काशाच्या धातूच्या घंटा व समई चोरी प्रकरणी रविवारी (दि.१७) रेवदंडा पोलिसांनी एकास अटक करून गुन्हा दाखल केला आहे.

चौल श्री पद्मावती व मल्लेश्वर मंदिर येथे १२ व १५ नोव्हेंबर २०२४ दरम्यान रात्री अज्ञाताने मंदिरातील पितळी काशाच्या धातूच्या घंटा व समई अंदाजे दहा हजार रुपयांचा ऐवज चोरीस नेल्याची फिर्याद तेथील रहिवासी जयवंत नागवेकर यांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात दिली होती.

चोरीप्रकरणी रेवदंडा पोलिसांनी थेरोंडा येथील महेश चायनाखवा या चोरट्यास रविवारी अटक करून गुन्हा दाखल केला. रेवदंडा पोलीस ठाणे सहाय्यक पोलीस निरिक्षक श्रीकांत किरविले यांचे मार्गदर्शनाखाली मनिष ठाकूर व सहकारी पोलीस यांनी तातडीने तपास करून आरोपी रंगेहाथ पकडण्यात यशस्वी झाले.

पान १ वरुन

## आमदार महेश बालदी यांच्या प्रचारार्थ भव्य बाईक रॅली

साईचे माजी सरपंच अण्णाशेठ पाटील, दिघाटीच्या सरपंच रजनी ठाकूर, सावळे ग्रामपंचायतीचे सरपंच सुनील माळी, भाताणचे सरपंच तानाजी पाटील, आपटा उपसरपंच मयुर शेलार, माजी सरपंच साई विद्याधर मोकल, कराडे खुर्द ग्रामपंचायतीचे माजी सरपंच किरण माळी, माजी सरपंच विजयशेठ मुरकुटे, माजी सरपंच व विद्यमान सदस्य अमित पाटील, वावेघरचे माजी सरपंच प्रकाश गाताडे, विजय चव्हाण, कसळखंडचे माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील, अनंत पाटील, नारपोलीचे माजी सरपंच दीपक पाटील, आपटा ग्रामपंचायतीचे सदस्य असद पिट्टू, तालुका उपाध्यक्ष प्रवीण खंडागळे, विद्याधर जोशी, संजय टेंबे, अजय तेजे, कर्नाळा उद्योगपती चंद्रकांतशेठ पाटील, केळवणे पं.स. विभागीय अध्यक्ष हिरामण ठाकूर, भाजपचे जेष्ठ नेते रामदास ठाकूर, राजाराम पाटील, अशोक पाटील, दिघाटी शाळा कमिटी अध्यक्ष विकास पाटील, माजी केळवणे पंचायत समिती युवा मोर्चा अध्यक्ष सुशील ठाकूर, प्रवीण ठाकूर, गणेश पाटील, भूषण पारंगे, बुथ अध्यक्ष जितेंद्र पाटील, केळवणे गाव अध्यक्ष रामचंद्र मोकल, ताराचे गणेश पाटील, केळवणे माजी उपसरपंच भानुदास गावंड, योगेश मुरकुटे, ग्रामपंचायत सदस्य ओंकार पाटील, राम गाताडे, रामचंद्र केदारी, बंडू शीद, रमेश मालुसरे, महादेव कांबळे, मनोज पवार, प्रतिक भोईर, सतीश साठे, संतोष चौलकर, प्रशांत पाटील, अजिंक्य सुर्वे, अक्षय केदारी, सुजीत पाटील यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पनवेलच्या चिखलेमध्ये शेकाप, 'उबाठा'ला धक्का!

धीरज गडकरी, अनंता पाटील, अनिल पाटील, समिक्षा पाटील, नम्रता पाटील, शांताराम शेळके, नितेश गायकर, निलेश शेळके, माधुरी शेळके, मिलिंद शेळके, नितीन शेळके, प्रियंका शेळके, विनोद पंडित, सुरेश पंडित, सचिन पंडित, सारिका पंडित, संदेश पंडित, राहुल चोरघे, अनिल चोरघे, अविनाश चोरघे, संदेश नारायण पंडित, भावेश पंडित, जिजाबाई चोरघे, किशोर रघुनाथ पंडित, किशोरी पंडित, साहिल शेळके, विघ्नेश शेळके, संदीप पंडित, नंदिनी पंडित, प्रवीण पंडित यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करण्यात आले. दरम्यान, या पक्षप्रवेशकर्त्यांनी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचीही भेट घेतली.



# प्रजापती संघटनेच्या वार्षिक परिषदेसाठी बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल, नवी मुंबई प्रजापती समाज विकास मंडळ रजि. राष्ट्रीय सामाजिक संघटनेची कार्यकारिणी बैठक रविवारी (दि.१७) पनवेल येथे संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सी.पी. प्रजापती यांच्या अध्यक्षतेखाली झाला. बैठकीत, कार्यकारिणी सदस्यांनी एकमताने निर्णय घेतला की, संस्थेची २० वी वार्षिक परिषद रविवार, १२ जानेवारी २०२५ रोजी आंध्र कला समिती हॉल, सेक्टर-२, नवी पनवेल येथे होणार आहे.



परिषदेतील प्रतिभा पुरस्कार – समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी. वधू आणि वर परिचय – समाजातील विवाहयोग्य तरुण पुरुष आणि महिलांसाठी. प्रजापती समाज रत्न सन्मान २०२५– समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींना. थोर व्यक्तिमत्त्वांची प्रेरक व्याख्याने – शैक्षणिक प्रगती, आर्थिक प्रगती, सामाजिक जाणीव, राजकीय सहभाग या विषयावर विशेष भाषणे. व्यवसाय/रोजगार निर्मितीवर विशेष चर्चा. रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम व संस्थेचा विस्तार आदी मुलांकडून सादर होणार आहेत.

समाजातील लोकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

बैठकीत गजेंद्र प्रजापती, बंधू प्रजापती, गोवर्धन प्रजापती, राजेंद्र प्रजापती, लवकुमार प्रजापती, आकाश प्रजापती, डॉ.ज्ञानप्रकाश प्रजापती, भगवानदास प्रजापती, संजय कुंभार, विशाल प्रजापती, विकास प्रजापती, रोहित प्रजापती, इंद्रकुमार प्रजापती, एस. व प्रियांश प्रजापती आदी कार्यकारिणी सदस्य सहभागी झाले होते.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींना नायजेरियाकडून सर्वोच्च पुरस्कार प्रदान



**अबुजा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी नायजेरियाच्या दौऱ्यावर आहेत. त्यांना नायजेरियातील सर्वोच्च सन्मानाने गौरविण्यात आले. १७ वर्षांनंतर नायजेरियाला भेट देणाऱ्या भारतीय पंतप्रधानांना 'ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर'ने सन्मानित करण्यात आले आहे. पंतप्रधान मोदी हा सन्मान मिळवणारे दुसरे परदेशी व्यक्ती ठरले आहेत. याआधी १९६९ साली राणी एलिझाबेथ यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. पंतप्रधान मोदींना परदेशी राष्ट्राकडून देण्यात येणारा हा १७वा आंतरराष्ट्रीय पुरस्कार आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदी शनिवारी नायजेरियात पोहचल्यावर त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. फेडरल कॅपिटल टेरिटरी मंत्री नेसोम इझेनवो वाइक यांनी अबुजा शहराची चावी पंतप्रधानांना भेट दिली. याशिवाय पंतप्रधान मोदींसाठी देशात भारतीय संस्कृतीचे सादरीकरण करण्यात आले. पंतप्रधानांच्या आगमनानंतर देशातील भारतीय समुदायाचा उत्साह दिसून आला. प्रत्येकजण पारंपरिक पोशाख घालून आणि हातात झेंडे घेऊन पंतप्रधानांना भेटण्यासाठी थांबला होता. पंतप्रधानांनी भारतीय समुदायातील लोकांची भेट घेतली. या वेळी काही लोकांनी पीएम मोदींचा ऑटोग्राफही घेतला.


रायगड, नवी मुंबई
वर्ष १७ • अंक १२२
www.ramprahar.com
# राम प्रहर
सोमवार, १८ नोव्हेंबर २०२४ • पाने ८ • किंमत ₹२


# आमदार प्रशांत ठाकूर आगे बढो...!

पनवेल : रामप्रहर वृत्त

**पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना सर्वस्तरांतून वाढता पाठिंबा मिळत आहे. त्यांनी गेल्या १५ वर्षांत केलेली विकासकामे आणि सामाजिक कार्य पाहता लोक त्यांच्या समर्थनासाठी पुढे येत आहेत. त्याचप्रमाणे विविध संस्था-संघटनाही साथ देण्यासाठी सरसावल्या आहेत. अशाच प्रकारे आमदार प्रशांत ठाकूर यांना विजयी करण्याचा निर्धार व्यक्त करीत रविवारी (दि. १७) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे पाठिंबापत्रे सुपूर्द करण्यात आली.**

## अबोली रिक्षा महिला संघटनेचा पाठिंबा

अबोली रिक्षा महिला संघटना महाराष्ट्र राज्यच्या वतीने महायुतीचे उमेदवार व कार्यत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांना आपला जाहीर पाठिंबा दिला आहे. या संदर्भातील पत्र संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष भगत यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केले.



महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी व कुटूंबाच्या उदरनिर्वाहासाठी हातभार लावता यावा या हेतूने अबोली रिक्षा महिला संघटना संस्थापक अध्यक्ष संतोष भगत यांनी स्थापन केली. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील पहिला अबोली रिक्षा थांबा नवीन पनवेल येथील डी मार्ट येथे सुरू करण्यात आला. भारतीय जनता पक्षदेखील महिलांच्या सक्षमीकरणासाठी सतत प्रयत्नशील असतो आणि म्हणूनच कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांना या संघटनेचे पदाधिकारी व महिला सदस्यांनी एकमताने जाहीर पाठिंबा देण्याचे ठरले. या संदर्भातील पत्र लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे संस्थापक अध्यक्ष संतोष भगत यांनी सुपूर्द केले. या वेळी प्रिंट पॉइंटचे संचालक संतोष सुतार उपस्थित होते.

महिलांसाठी स्वयंरोजगार निर्माण करून देणारी महाराष्ट्रातील पहिली संघटना म्हणून अबोली महिला रिक्षा संघटना कार्यरत आहे. पनवेल, कामोठे, कळंबोलीमध्ये १३० महिला या संघटनेच्या सदस्य आहेत. आमचे पदाधिकारी, सदस्यांनी एकमताने या विधानसभा निवडणुकीत कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांना पाठिंबा देण्याचे ठरवले असल्याचे संतोष भगत यांनी या वेळी सांगितले.

गेली १५ वर्षे पनवेलचे सक्षम आमदार म्हणून आमदार प्रशांत ठाकूर कार्य करीत आहेत. केलेली विकासकामे पाहता तेच पनवेलचे भविष्य घडवू शकतात, असा ठाम विश्वास आहे आणि म्हणूनच अबोली रिक्षा महिला संघटनेतर्फे त्यांना पाठिंबा देत असून भरघोस मतांनी निवडून देण्यासाठीही आम्ही प्रयत्न करू, अशी ग्वाहीही भगत यांनी या पाठिंबापत्रातून दिली आहे.

## जय गोपीनाथ प्रतिष्ठानचे समर्थन

जय गोपीनाथ प्रतिष्ठानच्या वतीने पनवेल विधानसा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना बिनशर्त पाठिंबा देण्यात आला आहे. याबाबतचे पत्र प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केले.

पनवेल परिसरातील वंजारी समाज बांधव व जय गोपीनाथ प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता कर्तृत्ववान व कर्तबगार आमदार प्रशांत ठाकूर यांना पाठिंबा दिला आहे. पाठिंबापत्र देतेवेळी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुभाष आंधळे, मार्गदर्शक बबन बारगजे, सचिव हनुमंत विघ्ने, सहसचिव, विठ्ठल घोळवे, ज्येष्ठ नागरिक प्रमुख मोहन केदार, प्रदेश उपाध्यक्ष विनोद खेडकर, जिल्हाध्यक्ष तुकाराम केदार, उपाध्यक्ष अंकुश खरमाटे, स्वप्नील राख, लक्ष्मण जायभाये, दिलीप गर्जे यांच्यासह इतर पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.



## रचना ऑफिसर्स सोशल असोसिएशन अॅपेक्स बॉडी संघटनेचीही साथ



रचना ऑफिसर्स सोशल असोसिएशन अॅपेक्स बॉडी संघटनेने पनवेल विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना आपला जाहीर केला असून याबाबतचे पत्र त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सपूर्द केले. या वेळी विठ्ठलराव जवादे, सुभाष खाडे, वेणू चंदन, डॉ. नंदकिशोर चंदन, डॉ. योगेश इंगळे उपस्थित होते.


**बालाजी सिम्फनीमधील सर्व सोसायट्यांचा आमदार प्रशांत ठाकूर यांना पाठिंबा/६**


# आमदार महेश बालदी यांच्या प्रचारार्थ भव्य बाईक रॅली

## कार्यकर्त्यांचा सहभाग; मतदारांकडून स्वागत





**रसायनी : रामप्रहर वृत्त**

असंख्य कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उरण विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार महेश बालदी यांची भव्य बाईक रॅली रविवारी (दि. १७) केळवणे आणि गुळसुंदे जिल्हा परिषद विभागातून काढण्यात आली. या रॅलीला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

उरण मतदारसंघात भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे आमदार महेश बालदी यांचा वेगवान प्रचार सुरू आहे. महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते संपूर्ण ताकद पणाला लावून त्यांचा प्रचार करत आहेत. त्या अंतर्गत रविवारी केळवणे आणि गुळसुंदे जिल्हा परिषद विभागातून भव्य बाईक रॅली काढण्यात आली. केळवणे येथून बाईक रॅलीला सुरुवात झाली. पुढे चावणे, कासप, कराडे, वाशिवली, चौक, दांडफाटा, रिस, चांभार्ली, मोहोपाडा, वावेघर, गुळसुंदे, आपटा, तारा असे मार्गक्रमण शिरढोणमध्ये सांगता झाली. या रॅलीदरम्यान ठिकठिकाणी आमदार महेश बालदी यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

या भव्य बाईक रॅलीमध्ये भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, रामदास ठोंबरे, खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, आपीआयचे तालुका अध्यक्ष महेंद्र धनगावकर, राष्ट्रवादीचे नेते व वासांबे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संदीप मुंढे, महिला आघाडीच्या नेत्या व सरपंच उमा मुंढे, माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, केळवणे जि.प. विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, गुळसुंदे विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, वासांबे विभागीय अध्यक्ष सचिन तांडेल, माजी पं.स. सदस्य तनुजा टेंबे, **(पान २ वर..)**

## निवडक

### 'आप'ला धक्का! मंत्री गेहलोतांचा राजीनामा, पक्षालाही राम राम

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीत आम आदमी पक्षाला मोठा धक्का बसला आहे. दिल्ली सरकारचे ज्येष्ठ मंत्री कैलाश गेहलोत यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे तसेच त्यांनी पक्षालासुद्धा रामराम ठोकला आहे. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर आरोप करत कैलाश गेहलोत यांनी हे पाऊल उचलल्याने खळबळ उडाली आहे. दिल्लीच्या आतिशी सरकारमध्ये ते परिवहन मंत्री म्हणून कार्यरत होते.

### बाबा सिद्दिकी हत्येप्रकरणी आणखी एकाला अटक

**अकोला :** मुंबई क्राईम ब्रँचने रविवारी (दि. १७) माजी मंत्री बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणात महाराष्ट्रातील अकोला येथून एकाला अटक केली आहे. त्यामुळे आता अटक करण्यात आलेल्यांची संख्या २५ झाली आहे. गुजरातच्या आणंद जिल्ह्यातील पेटलाद येथील रहिवासी सलमानभाई इक्बालभाई वोहरा याला अकोल्यातील बाळापूर येथून अटक करण्यात आली. त्याने इतर आरोपींना आर्थिक मदत केली होती.

## मी साहेबांना सोडले नाही -उपमुख्यमंत्री पवार

**बारामती : प्रतिनिधी**



लोकांना वाटत असेल या वयात मी साहेबांना सोडायला नको होते, पण मी साहेबांना सोडलेले नाही. सर्व आमदारांचे तसे मत होते, सगळ्यांच्या सह्या होत्या, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे. ते बारामती तालुक्यातील ढाकळे येथे प्रचार सभेदरम्यान बोलत होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, मतदारसंघातील अनेक मंजूर केलेल्या कामांना त्या वेळी सरकारने स्थगिती दिला होती. जनतेची कामे होत नव्हती. मी विरोधी पक्षनेता होतो. पाच वर्षात माझी अडीच वर्षे वाया गेली. तरीदेखील सत्तेत सहभागी झाल्यावर नऊ हजार कोटी रुपयांचा विकास निधी बारामतीकरांसाठी आणू शकलो. पुढेदेखील विकास करायचा आहे.

### स्मृतिदिनानिमित्त स्व. बाळासाहेब ठाकरेंना अभिवादन

**मुंबई :** शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचा रविवारी (दि. १७) बारावा स्मृतिदिन होता. त्यानिमित्त त्यांना सर्वपक्षीयांकडून आदरांजली अर्पण करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुलाबा येथील बाळासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले, तर दादर येथील शिवाजी पार्कमधील बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व कुटुंबीयांनी अभिवादन केले.

# पनवेलच्या चिखलेमध्ये शेकाप, 'उबाठा'ला धक्का!

## ग्रामपंचायत सदस्य समर्थकांसह भाजपमध्ये दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी अवघे दोन दिवस शिल्लक राहिले असताना तालुक्यात शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला जोरदार धक्का बसला आहे. चिखले ग्रुप ग्रामपंचायतीच्या विद्यमान सदस्यांनी त्यांच्या शेकडो समर्थकांसह भारतीय जनता पक्षामध्ये रविवारी (दि. १७) जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी स्वागत केले. या पक्षप्रवेशामुळे शेकाप आणि उबाठा गटाला मोठा धक्का बसला आहे.

या पक्षप्रवेशावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, पळस्पे जि.प. विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, माजी सरपंच नामदेव पाटील, हिरामण पाटील, माजी सदस्य रमेश गडकरी, बूथ अध्यक्ष राम फडके, योगेश पाटील, भालचंद्र पाटील, संजय शेळके, निलेश पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

पनवेल मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या खंबीर नेतृत्वाखाली अनेक विकासाची कामे मार्गी लागली आहेत. त्यांच्या या विकासात्मक कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून शेकाप आणि 'उबाठा'तील चिखले ग्रुप ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य अविनाश पाटील, मानसी शेळके, वर्षा पंडित यांच्यासह **(पान २ वर..)**



# महिला मिनी मॅरेथॉन अन् मतदान जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महापालिका आणि रोटरी क्लब सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने एक धाव महिला सुरक्षेसाठी मिनी या आशयाखाली रविवारी (दि. १७) पनवेलच्या वडाळे तलाव येथे मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती करण्यात आली.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या मॅरेथॉनवेळी रोटरी क्लब सेंट्रलचे सर्व पदाधिकारी व सदस्य, महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त डॉ.रुपाली माने, समाज विकास अधिकारी स्वप्नाली चौधरी, स्वीप पथकामधील पालिका अभियंता प्रसाद परब, माहिती व व्यवस्थापन प्रणाली तज्ज्ञ गजानन देशमुख उपस्थित होते. त्याचप्रमाणे मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

या मॅरेथॉनदरम्यान उपायुक्त वैभव विधाते यांच्या सूचनेनुसार २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत सर्व महिलांनी आपला मतदानाचा अधिकार बजवावा, असे सांगून एक मत आपल्या भविष्यासाठी तसेच एक धाव महिला सुरक्षेसाठी याबाबत उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.

या वेळी स्वीप पथकामार्फत वासुदेव आणि फ्लॅशमॉबमार्फत मतदान जनजागृती करण्यात आली तसेच मतदान प्रतिज्ञा घेण्यात आली व सर्वांनी मतदान करावे याबद्दल आवाहन करण्यात आले.

# रायगडात २६८० मतदारांनी बजावला गृहमतदानाचा हक्क

**रायगड : रामप्रहर वृत्त**





केंद्रीय निवडणूक आयोगाने ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व प्रमाणपत्र असलेल्या नागरिकांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी घरबसल्या मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यात १६ नोव्हेंबरअखेरपर्यंत एकूण दोन हजार ६८० मतदारांनी गृहमतदानाचा हक्क बजावला.

पनवेल विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या १२४ ज्येष्ठ नागरिकांनी, १३ दिव्यांग मतदार अशा एकूण १३७ मतदारांनी घरून मतदानाचा हक्क बजावला. कर्जत मतदारसंघात ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या १५८ ज्येष्ठ नागरिकांनी, १७ दिव्यांग मतदार अशा एकूण १७५ मतदारांनी गृहमतदान केले. उरण मतदारसंघात ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या ६६ ज्येष्ठ नागरिकांनी, १६ दिव्यांग मतदार अशा एकूण ८२ मतदारांनी घरबसल्या मतदान केले.

पेण मतदारसंघात ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या ५४५ ज्येष्ठ नागरिकांनी, ५८ दिव्यांग मतदार अशा एकूण ६०३ मतदारांनी गृहमतदान सुविधेद्वारे कर्तव्य पार पाडले. अलिबाग मतदारसंघात ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या ४४२ ज्येष्ठ नागरिकांनी, २७ दिव्यांग मतदार अशा एकूण ४६९ मतदारांनी गृहमतदान केले.

श्रीवर्धन मतदारसंघात ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या ४२३ ज्येष्ठ नागरिकांनी, १०७ दिव्यांग मतदार अशा एकूण ५३० मतदारांनी घरबसल्या मतदानाचा हक्क बजावला. महाड मतदारसंघात ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या ५७१ ज्येष्ठ नागरिकांनी, ११३ दिव्यांग मतदार अशा एकूण ६८४ मतदारांनी या गृहमतदान सुविधेचा लाभ घेत मतदानाचा हक्क बजावला.

या प्रक्रियेसाठी गोपनीय पद्धतीने मतदान करण्याची सुविधा पुरविण्यात आली होती. संबंधित विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त करण्यात आलेले क्षेत्रीय अधिकारी, मतदान अधिकारी तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी गृहमतदान प्रक्रियेत सहभाग घेतला. या वेळी ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांनी निवडणूक आयोगाचे आभार मानले.

# आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रचार रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद



**नागोठणे : बातमीदार**

पेण-रोहा-सुधागड विधानसभेचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रचारार्थ नागोठणे येथील केएमजी विभागात (कुंभार आळी, मराठा आळी, गवळ आळी व रामाईनगर ) काढण्यात आलेल्या रॅलीला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

गवळ आळीतील राधाकृष्णा साईबाबा गणपती मंदिरात महायुतीच्या नेतेगण व कार्यकर्त्यांनी दर्शन घेऊन श्रीफळ वाढवून प्रचार रॅलीचा प्रारंभ करण्यात आला.

नागोठणे केएमजी विभागात निघालेल्या प्रचार रॅलीत राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, भाजप नेते मारुती देवरे, राष्ट्रवादीचे नेते विलास चौलकर, चंद्रकांत गायकवाड, भाजप जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, तालुका सरचिटणीस आनंद लाड, तालुका अध्यक्ष अपर्णा सुटे, भाजप शहर अध्यक्ष सचिन मोदी, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, भाजप तालुका क्रीडा संयोजक शेखर गोळे, शामकांत नेरपगार, अनिल पवार, शिवसेना शहर प्रमुख संतोष चितळकर, सुनील लाड, सिराज पानसरे, प्रियांका पिंपळे, मुग्धा गडकरी, संज्योती लाड, दिनेश घाग, जयराम पवार, मधुकर चौलकर, गणेश घाग, ॲड. रमेश जाधव, बाबू घाग, अंकुश सुटे, सखाराम ताडकर, सुदेश येरुणकर, शेखर जाधव, नामदेव लाड, बिपीन सोष्टे, दिलीप धाडसे, केतन पोफळकर, सचिन चौलकर, अप्पा नागोठणेकर, फातिमा सय्यद, तब्बसूम कडवेकर आदी सहभागी झाले होते.

# माणगाव येथे प्रभू रामाचे मंदिर बांधण्यासाठी सहकार्य करणार

## * खासदार तटकरे यांचे उत्तर भारतीयांना आश्वासन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथे प्रभू रामचंद्राचा मंदिर बांधण्यासाठी मी असेन, आदिती असेन सर्वोतोपरी सहकार्य करणार असे रायगड-रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खासदार सुनील तटकरे यांनी उत्तर भारतीय बांधवांना आश्वासित करताना सांगितले.

या स्नेहसंमेलनात आदिती तटकरे यांनी समाज बांधव-भगिनींची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. स्नेहसंमेलनात खासदार सुनील तटकरे यांचे कोकण उत्तर भारतीय एकता मंच रायगड अध्यक्ष ग्यानचंद जैस्वाल, ज्योती जैस्वाल यांनी समाज बांधवांतर्फे स्वागत केले.

कोकण उत्तर भारतीय एकता मंच रायगड यांचा स्नेहसंमेलन शुक्रवार (दि.१५) नोव्हेंबर रोजी माणगाव येथे आयोजित करण्यात आला होता. या स्नेह मेळाव्यात खासदार सुनील तटकरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.





आदितीच्या प्रचारार्थ माणगावात काढण्यात आलेल्या रॅलीला उत्स्फूर्त असा प्रतिसाद माणगावकरांनी दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानतो. जेव्हा या जिल्ह्याचे विभाजन होईल तेव्हा दक्षिण रायगडातील मुख्यलाय हे माणगाव असेल असे सांगत शासनाने आणलेल्या योजना या वेळी तटकरेंनी उपस्थितांच्या समोर ठेऊन येत्या २० तारखेला महायुतीच्या उमेदवार अदितीच्या घड्याळ निशाणी शेजारील बटन दाबून तिला भरभरून मतांनी विजयी करा, असे आवाहन तटकरे यांनी करून समाज बांधवाना स्नेहसंमेलनाच्या शुभेच्छा दिल्या.

या स्नेहसंमेलनास शिवसेनेचे राज्यप्रवक्ते ॲड. राजीव साबळे, ज्येष्ठ नेते लालता कुशवाह, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, उत्तर भारतीय एकता मंच रायगड अध्यक्ष ग्यानचंद जैस्वाल, उपाध्यक्ष शिवचरण चौधरी, नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, उपनगरध्यक्ष हर्षदा सोंडकर, शिवसेना शहरप्रमुख सुनील पवार, माजी उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, रत्नाकर उभारे, दिलीप जाधव, पाणीपुरवठा सभापती प्रशांत साबळे, नगरसेवक कपिल गायकवाड, नगरसेविका रिया उभारे, व्यापारी घनश्याम शेठ, माणगाव शहर राष्ट्रवादीचे अध्यक्ष नितीन वाढवळ, स्वीकृत नगरसेवक मनोज पवार, प्रसाद धारिया, सुमित काळे,सौरभ खैरे, सचिन शरद देसाई, उमेश कदम, मुन्ना सिंग, धर्मराज कुशवाह, ज्योती जैस्वाल, चंदुलाल गुप्ता, नंदलाल गुप्ता, योगेंद्र विश्वकर्मा यांच्यासह समाज बांधव - भगिनी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘श्री चौंडेश्वरी माता मंदिराची शिल्लक कामे पूर्ण करणार’

**नागोठणे : बातमीदार**

वरवरठणे गावात यापूर्वी शेकापचे वर्चस्व असूनही विकास कामे करायला पाहिजेत ही भूमिका ठेवून अनेक विकासकामे केली. त्यामुळे हा गाव शंभर टक्के माझा झाला. भविष्यात वरवठणे ग्रामदेवता श्री चौंडेश्वरी मातेच्या मंदिरासमोरील सुशोभीकरणासह गावातील इतर शिल्लक कामेही करण्यात येतील, असे ठोस आश्वासन देत भरघोस मतांनी निवडून देण्याचे आवाहन आमदार व महायुतीचे उमेदवार रविशेठ पाटील यांनी वरवठणे ग्रामस्थांना केले.



महायुतीतर्फे भाजपचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रचारार्थ नागोठण्याजवळील वरवठणे येथे आयोजित केलेल्या सभेत आमदार रविशेठ पाटील बोलत होते. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे विभागीय नेते भाईसाहेब टके, पांडुरंग म्हात्रे, दत्ता करजेकर, बाळासाहेब टके, गणपतशेठ म्हात्रे, सुभाष पाटील, सिराजभाई पानसरे, संतोष लाड, प्रकाश पाटील माजी उपसरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, वरवठणेचे माजी उपसरपंच संतोष म्हात्रे, माजी ग्रा. पं. सदस्य परशुराम बैकर, सदस्य बाबाजी पवार, रमेश म्हात्रे, नथुराम शेडगे, मारुती दांडेकर, खेळूराम भोय, कृष्णा जाधव, नथुराम पाटील, नथुराम दांडेकर, दिनेश दांडेकर, बबन पाटील, ऋषिकेश पाटील, सचिन खांडेकर, तात्या पौत्रिक, गिरीश शीद, तानाजी हंबीर, यशवंत वरगुडे, हरी पिंगळा, चंद्रकांत पिंगळा आदींसह ग्रामस्थ व महिला या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या सभेत पांडुरंग म्हात्रे गणपतशेठ म्हात्रे व ऋषिकेश सुभाष पाटील यांनी आपले विचार व्यक्त करताना रविशेठ पाटील यांना भरघोस मतांनी निवडून देण्याची आवाहन केले. या सभेपूर्वी आमदार रवीशेठ पाटील यांनी वरवठणे गावची ग्रामदेवता श्री चौंडेश्वरी मातेच्या मंदिरात जाऊन मातेचे दर्शन घेतले. या वेळी उपस्थित ग्रामस्थांनी आमदार रविशेठ पाटील यांना पुन्हा एकदा भरघोस मतांनी निवडून येण्यासाठी मातेला साकडे घातले.

# अष्टमी शहरात आदिती तटकरे यांचा प्रचार

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील अष्टमी शहरात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी शनिवारी (दि.१६) सायंकाळी महायुतीचे उमेदवार आदिती तटकरे यांचा प्रचार केला.

महायुतीच्या कार्यकर्त्यांनी घरोघरी जात प्रचार पत्रके वाटली. या प्रचार रॅलीत महिलांचा सहभाग लक्षणीय होता. आमची लाडकी लेक आदिती तटकरे यांना भरघोस मताने निवडून देणार असल्याचे या वेळी महिला कार्यकर्त्यांनी सांगितले. या वेळी राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, भाजप शहर अध्यक्ष यज्ञेश भांड, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, माजी उपनगराध्यक्ष वसंत शेलार, महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, महेश कोलटकर, मयुर दिवेकर, पूजा पोटफोडे, नेहा पिंपळे, शिल्पा धोत्रे, प्राजक्ता चव्हाण, श्रध्दा पाटणकर, चेतना पार्टे, मानसी दाते, ज्योती सनीलकुमार, निता कोलाटकर, अश्विनी उकडे, नितीन पिंपळे, सागर बोबड, समाधान शिंदे, अनिल सुर्वे, केदार साळवी, तेजश बोथरे, महेश मेस्त्री, अभिजीत लुमन, समिर दर्जी, विकास शिंदे, रेखा छेडा, आसावरी मोकल, दिव्या सुर्वे, निलेश शिर्के, मयुर पायगुडे, चंद्रकांत पार्टे आदी उपस्थित होते.

महायुतीच्या उमेदवार आदिती तटकरे यांचा अष्टमी शहरातील बाजारपेठ, कोळी वाडा, कासार आळी, परीट आळी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, मुकुंद नगर, मराठा आळी व मोहल्ला आदी शहरातून प्रचार करण्यात आला.

अष्टमी शहराला मोठ्या प्रमाणात विकास निधी खासदार सुनील तटकरे, महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे व अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून मिळाला आहे. त्यामुळे अष्टमी शहराचा मोठ्या प्रमाणात विकास झाला असल्याने अष्टमीकर अदिती तटकरे यांना भरघोस मताधिक्य देतील याची खात्री आहे.



# माथेरानमध्ये भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक

**माथेरान : प्रतिनिधी**

कर्जत-खालापूर विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माथेरानमधील भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक येथील रंगोली हॉटेल येथे झाली.



या वेळी कर्जत विधानसभा निरीक्षक असलेले गोव्याचे आमदार संकल्प आमोणकर यांनी माथेरानमधील सर्व भाजप पदाधिकारी यांच्यासोबत चर्चा विनिमय करून त्यांना महायुतीचा धर्म पाळायचा असून मोठ्या मताधिक्याने महायुती उमेदवार विजयी करण्याचे आवाहन केले.

कर्जत-खालापूर विधानसभा निवडणुकीत महायुतीचे अधिकृत उमेदवार महेंद्र थोरवे हे निवडणूक लढवीत आहेत. माथेरान भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी तसेच महिला आघाडीनेदेखील त्यांच्या विजयासाठी जोरदार प्रचार फेऱ्या सुरू केल्या आहेत. माथेरानमधून थोरवे यांना भरघोस मताधिक्य मिळावे यासाठी सर्वजण जीवाचे रान करताना दिसत आहेत.

यामध्ये भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते देखील जोमाने कामाला लागलेले दिसत आहेत. याच कर्जत विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येथे भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक हॉटेल रंगोली येथे शनिवारी झाली.

कर्जत विधानसभा निरीक्षक संकल्प आमोणकर यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करते वेळी सांगितले की, माथेरान शहरातून महायुतीच्या उमेदवाराला जास्तीत जास्त मतदान झाले पाहिजे व आपले सर्व कार्यकर्ते हे मतदारांपर्यंत पोहचले पाहिजेत तसेच महायुतीमधील कार्यकर्त्यांमध्ये काही मतभेद असल्यास सध्या तरी हे मतभेद बाजूला ठेऊन सर्वांनी एका ताकदीने महायुती चे उमेदवार महेंद्र थोरवे यांना पुन्हा एकदा याठिकाणी निवडून आणायचे आहे, असे सांगण्यात आले.

माथेरान शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ यांनी यावेळी सांगितले की माथेरान मधील मतदारसुद्धा येथे विकासाला साथ देतील. या वेळी संकल्प आमोणकर यांच्या समवेत येथे भाजप कर्जत तालुका अध्यक्ष राजेश भगत, भाजप जेष्ठ कार्यकर्ते नितीन कांदळकर, माजी नगराध्यक्ष आकाश चौधरी, सरचिटणीस राजेश चौधरी, उपाध्यक्ष किरण चौधरी, माजी नगरसेवक प्रदीप घावरे, चंद्रकांत जाधव, राकेश चौधरी, संदीप कदम आणि असंख्य महिला कार्यकर्त्या उपस्थित येथे होत्या.

# वावंढळवाडीच्या मारूती मंदिरात कार्यक्रम

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील वावंढळवाडी येथील मारूती मंदिरात हभप.कमलाकर काईनकर यांच्या मार्गदर्शनाखाली कोजागिरी पौर्णिमा ते त्रिपुरा पौर्णिमा असा एक महिना पहाटे काकडा आरती कार्यक्रम सुरू होता, त्याच्या सांगता कार्यक्रमात दीपोत्सवाचे अयोजन करण्यात आले होते.

या वेळी हभप.संदिप महाराज यांनी उपस्थित वारकरी व ग्रामस्थांचे प्रबोधन केले. या वेळी देवाच्या मुर्तींला, महीला भगिनी यांनी काकड्याने ओवाळले. त्या नंतर दीपोत्सव साजरा करण्यात आला. गावातील व पंचक्रोशीत महीला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हभप योगिता रोशन पंदेकर यांनीही काकडा आरती का करावी? काकडा आरतीला धार्मिक आणि शास्त्रीय कारण यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. राजेंद्र मोरे, हभप रमेश महाडिक, हभप अरूण दळवी, पत्रकार अर्जुन कदम यांचेही मार्गदर्शन झाले. एक महिना कार्यक्रमाचे नियोजन गावातील तरुण मंडळ यांनी रामदास काईनकर यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

महाप्रसादनंतर कार्यक्रमाची सांगता झाली. आरतीमधील काही आरत्या संत एकनाथ महाराज आणि संत तुकाराम महाराज यांनी रचल्या आहेत.



# माणगावात राजाभाऊ ठाकूर यांची सभा

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाचे काँग्रेस पुरस्कृत अपक्ष उमेदवार राजाभाऊ ठाकूर यांच्या प्रचारार्थ शनिवारी सभेचे आयोजन करण्यात आले होते.



या सभेत उमेदवार राजाभाऊ ठाकूर यांनी मार्गदर्शन केले. या सभेला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाचे महासचिव तथा ठाणे जिल्हा प्रभारी असलेले चंद्रकांत पाटील, रायगड जिल्हा काँग्रेस सचिव डॉ.नरेंद्र सिंग, शरदचंद्रजी पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रायगड जिल्हा सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष सदानंद येलवे, रोहा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुनील देशमुख, तळा तालुका अध्यक्ष शरद भोसले, माणगाव तालुका काँग्रेसचे अध्यक्ष विलास सुर्वे, राज्य बेलदार समाज संघटनेचे उपाध्यक्ष विठ्ठल मोहिते, रोहा तालुका वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष देविदास जाधव आदी उपस्थित होते.

# मतदान करण्याचे आवाहन

**कर्जत :** मतदान हा घटनेने दिलेला अधिकार आहे. देश हितासाठी शंभर टक्के मतदान करा, असे आवाहन राष्ट्रीय मतदाता मंचाच्या वतीने करण्यात आले आहे.

राष्ट्रीय मतदाता मंचाचे दिनेश रणदिवे, विवेक पाटील हे महाराष्ट्रात जास्तीत जास्त मतदान होण्याकरिता कर्जत शहरात फिरून मतदारांची जनजागृती करीत आहेत. कमी टक्के मतदान म्हणजे समाजात दुही पसरविणाऱ्यांना वरदान ठरत आहे. जाती - मजहबच्या वोट बँकेचा वाढता परिणाम होत असतो. सामान्य मतदार खोट्या अफवांना बळी पडू शकतो. देशहिताची आजची निकड ओळखून मतदान करा. तळागाळातील जनतेच्या भल्यासाठी मतदान करा. व्यक्तिगत फायद्यासाठी नव्हे तर राष्ट्रहितासाठी मतदान करा. मतदानाच्या दिवशी सुट्टी किंवा सहलीचा विचार न करता शंभर टक्के मतदान करा, असे आवाहन राष्ट्रीय मतदाता मंचच्या वतीने करण्यात येत आहे.

# नांदगाव हायस्कूलतर्फे मतदारजागृती रॅली

**मुरूड : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय नांदगाव हायस्कूल तर्फे जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांची मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली होती. या रॅलीसाठी शेकडो च्या संख्येने शालेय विद्यार्थी शामिल झाले होते. मतदार राजा जागा हो, मतदान करा राष्ट्रीय कर्तव्य बजावां,लोकशाही चां जयजयकार मतदान आपले हक्काने बजावा अशा विविध घोषणा देत सदरची रॅली नांदगाव बाजारपेठ, माळी वाडा, उस्रोळी टेप,आदी भागात फिरवण्यात आली. निवडणूक आयोगाच्या निदर्शना प्रमाणे सदरची रॅली शाले तर्फे काढण्यात येऊन मोठी जनजागृती करण्यात आली. मुख्याध्यापक अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महेश वाडकर, योगेश पाटील, दत्ता खुळपे, राहील घलटे, महादू अहीरे, सागर राऊत तसेच सर्व महिला शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# आमदार प्रशांत ठाकूर यांना सर्व समाज मताधिक्य देणार -अ‍ॅड. बिनेदार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भगवान गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांची अपार श्रद्धा आहे. आणि त्या दृष्टिकोनातून ते सर्व समाजाच्या हिताचे विधायक कार्य करत असतात, त्यामुळे समाजाच्या अधिक उन्नतीसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांना सर्व समाज मताधिक्य देऊन विजयी करणार आहे, असे प्रतिपादन भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस, मागासवर्गीय समाजाचे नेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार यांनी केले.



अ‍ॅड. प्रकाश बिनेदार यांनी पुढे बोलताना सांगितले की, आमदार प्रशांत ठाकूर यांनी दलित मागासवर्गीय सर्व समाजाचा नेहमीच विचार केला आहे. इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय स्मारक व्हावे यासाठी विधिमंडळाच्या अधिवेशनात फलक झळकावले म्हणून एक दिवसाचे त्यांचे निलंबन झाले होते आणि बाबासाहेबांसाठी त्यांनी हे निलंबन स्वीकारून त्यांच्याप्रती असलेल्या आस्थेची जाणीव समाजाला दिसली आहे. महाड येथील राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा असलेल्या चवदार तळ्याचे सौंदर्यीकरण व जलशुद्धीकरणाचे काम लवकरात लवकर सुरू करण्याच्या दृष्टिकोनातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी पावसाळी अधिवेशनात शासनाचे लक्ष वेधले. त्यामुळे पंजाब राज्यातील अमृतसर येथील सुवर्ण मंदिराच्या धर्तीवर ओझोन प्रक्रिया करून चवदार तळे सौंदर्यीकरण व जलशुध्दीकरण करण्यासाठी ६५.५२ कोटी रुपये मंजूर करून त्याप्रमाणे या कामाची पुढील कार्यवाही होत आहे.

त्याचप्रमाणे पनवेल आणि परिसरात अनेक ठिकाणी बुद्धविहार आणि समाजमंदिरे लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामार्फत उभारण्यात आली. कामोठे येथे नालंदा बुद्धविहाराची स्थापना केली. नवीन पनवेल येथे भीमप्रेरणा सांस्कृतिक केंद्राच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या भवन निर्मितीला पाठबळ दिले. तसेच बुद्धगया प्रतिष्ठान अंतर्गत आम्रपाली बुद्धविहार, शिवकर, रोडपाली अशा अनेक ठिकाणी बुद्धविहारांच्या उभारणीसाठी मोलाचे सहकार्य केले आहे.

समाजाचा हित जपणारा पक्ष म्हणून भारतीय जनता पार्टी ओळखली जाते. त्यामुळे सर्व समाजाच्या हिताच्या योजना यापुढेही सुरु राहण्यासाठी महायुतीचे सरकार कायम राहणे महत्वाचे आहे, असेही त्यांनी नमूद करत पनवेल विधानसभा मतदार संघातील सर्व समाज, दलित, बौद्ध, चर्मकार, मातंग समाज लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, त्यामुळे २० नोव्हेंबरला कमळ निशाणीसमोरील बटन दाबून आमदार प्रशांत ठाकूर यांना भरघोस मतांनी निवडून देण्याचा निर्णय सर्व समाजाने घेतला आहे, असेही प्रकाश बिनेदार यांनी अधोरेखित केले.

# करंजा बंदराचे काम लवकरच पूर्ण करणार -आमदार महेश बालदी

**उरण : रामप्रहर वृत्त**



स्वतःचा अकार्यक्षमपणा लपवण्यासाठी यांना दुसऱ्यांची जात काढण्यात जास्त मजा वाटते, अशी टीका उरणचे आमदार महेश बालदी यांनी शनिवारी (दि.१६) विरोधकांवर केली. करंजा बंदरे हे माझ स्वप्न आहे. त्यामुळे राहिलेले बंदराचे काम हे लवकरच पूर्ण करणार, अशी ग्वाही मच्छिमारांना दिली.

उरण मतदार संघाचे भाजप महायुतीचे उमेदवार महेश बालदी यांचा झंझावाती प्रचार संपुर्ण मतदार संघात सुरू आहे. त्याअंतर्गत शनिवारी करंजा येथे आमदार महेश बालदी यांच्या प्रचारासाठी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या सभेला भाजपचे तालुका अध्यक्ष रवी भोईर, उरण शहर अध्यक्ष कौशिक शहा, रवींद्र कोळी, चाणजे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच जितेंद्र घरत, करंजा मच्छिमार सोसायटीचे चेअरमन प्रदिप नाखवा, नवापाडा ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष मनोहर कोळी, नवापाडा पर्सनेट असोसिएशनचे अध्यक्ष विनय कोळी, माजी चेअरमन शिवदास नाखवा, के. एल.कोळी, व्हाईस चेअरमन राजेंद्र नाखवा, महेश नाखवा, रविंद्र कोळी, रमेश नाखवा, नरेश कोळी, नवापाडा मच्छीमार सोसायटी चेअरमन प्रितम कोळी, रमेश नाखवा, माजी सदस्य रवींद्र म्हात्रे, द्रोणागिरी ग्रामसुधार मंडळाचे अध्यक्ष रूपेश पाटील, महेश भोसले, प्रतिक म्हात्रे, गणेश कातकरी, करण म्हात्रे, अतुल म्हात्रे, आकाश कश्यप, रघुनाथ पवार, प्रितम कोळी, योगेश पांचाळ यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

## निवडक

### ‘मविआ’च्या लीना गरड यांची रॅली

**पनवेल :** महाविकास आघाडीच्या उमेदवार लीना गरड यांची



पनवेल, नवीन पनवेल परिसरातून मोटरसायकल रॅलीद्वारे प्रचार फेरी काढण्यात आली होती. पनवेल शहर तसेच नवीन पनवेल परिसरात उमेदवार लीना गरड यांच्यासोबत रॅलीत शिवसैनिक, युवा सेना व इतर संघटनेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### स्व.बाळासाहेब ठाकरे यांची पुण्यतिथी

**पनवेल :** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त तळोजा फेज २ येथे असलेल्या बाळासाहेब लॉ कॉलेजमध्ये त्यांना आदरांजली वाहण्यात आली. या वेळी ज्येष्ठ शिवसैनिक बाळाराम मुंबईकर यांनी हार घालून श्रद्धांजली वाहिली. त्यावेळी शिवसेना रायगड जिल्हा संपर्कप्रमुख बबन पाटील यांनी आदरांजली वाहिली. या वेळी शिवसेनेचे मिथुन मढवी, सारंग मढवी, दुबे, युवराज पाटील, अभिमन्यू गोरे, तेजस पाटील, विक्की पाटील उपस्थित होते.

# आमदार महेश बालदींची कन्याही प्रचारात

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून उरण विधानसभा मतदार संघात भाजपने प्रचारात आघाडी घेतली आहे. उरणचे विद्यमान आमदार व भाजप उमेदवार महेश बालदी यांची छोटी कन्या नेहा हिने स्वत:ला प्रचारात झोकून दिले आहे.

ती मतदार संघातील घराघरात जावून मतदारांना भाजपाच्या कमळ चिन्हाला मत देण्याचे व विजयी करण्याचे आवाहन करीत आहे. वडिलांसाठी मतदारांच्या घराघरात जावून प्रचार करणाऱ्या नेहा बालदी हिचे जनतेतून कौतुक होत आहे.



उरण विधानसभा मतदार संघात या वेळी तिरंगी लढत होत असून विद्यमान आमदार महेश बालदी यांना शिवसेनेचे मनोहर भोईर व शेकापचे प्रितम म्हात्रे यांचे आव्हान उभे आहे, मात्र गेल्या पाच वर्षांत आमदार बालदी यांनी केलेल्या कामांच्या बळावर त्यांना हे आव्हान वाटत नसून त्यांना विजयाची खात्री आहे, मात्र विरोधकांनी जातीय प्रचार सुरू केल्याने जनतेत चर्चा होत आहेत. उरणची जनता विकासाला मत देणार असल्याचे महेश बालदींना विश्वास आहे.

उरण विधानसभा मतदारसंघात भाजपाच्या तरुण कार्यकर्त्यांची फळी प्रचारात उतरली असून आमदार महेश बालदी यांची छोटी कन्या नेहा महेश बालदी प्रचार फेऱ्यांमध्ये हिरीरीने सहभागी होत असून घराघरात जावून भाजपाच्या कमळ चिन्हाला मतदान करा व विजयी करा, असे आवाहन करीत आहे. वडिलांसाठी मुलगी प्रचाराच्या रणधुमाळीत उतरली असल्याने जनतेतून या लाडक्या कन्येचे कौतुक होताना दिसत आहे.

# सर्वधर्मसमभाव जपणाऱ्या आमदार प्रशांत ठाकूर यांना विजयी करा

## सय्यद अकबर यांचे मुस्लिम बंधू-भगिनींना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**





मुस्लिम बांधवांच्या सर्वांगीण विकासाकरता आमदार प्रशांत ठाकूर यांना चौथ्यांदा निवडून देणे हे आपले आद्यकर्तव्य आहे, असे आवाहन भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष, अल्पसंख्याक मोर्चा सय्यद अकबर यांनी केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांचा घरोघरी जाऊन प्रचार करत असताना त्यांनी उपरोक्त वक्तव्य केले. मुस्लिम बांधवांच्या घरोघरी जात सय्यद अकबर हे प्रचार करत आहेत. आमदार प्रशांत ठाकूर यांना प्रचंड प्रमाणामध्ये मुस्लिम बांधवांची मते मिळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तसेच अल्पसंख्यांक मोर्चाचे अध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या मार्गदर्शनानुसार सय्यद अकबर व त्यांचे तमाम कार्यकर्ते मुस्लिम बांधवांच्या घरोघरी जात आमदार प्रशांत ठाकूर यांचा प्रचार करत आहेत. नुकताच सय्यद अकबर यांनी पनवेल येथील पटेल मोहल्यातील भारत नगर येथे प्रचार दौरा केला. मुस्लिम बांधवांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना मत का दिले पाहिजे, याचे विश्लेषण सय्यद अकबर व त्यांचे सहकारी घरोघरी जाऊन करत आहेत.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे मशीद, कब्रस्तान, मदरसे याकरता जेव्हा सहकार्य मागितले तेव्हा तेव्हा अपेक्षेपेक्षा जास्त मदत या दोघांच्याकडून झालेली आहे तसेच त्यांनी मुस्लिम समाजातील मुलांना शिक्षणाकरता भरघोस अर्थसहाय्य केलेले आहे. मुस्लिम समाजातील गरीब व गरजू लोकांना विनामूल्य वैद्यकीय मदत मिळवून दिली आहे. त्यांच्यामुळेच पनवेलमध्ये अल्पसंख्यांक समाजातील मुलींकरता वस्तीगृह निर्माण झालेले आहे. त्याचा फायदा हजारो अल्पसंख्यांक समाजातील मुलींना होत आहे. त्यांचे हे कार्य आम्ही घरोघरी जाऊन सांगत आहोत, असे सय्यद अकबर म्हणाले.

भारत नगरमधील रहिवाशांना आवाहन करताना सय्यद अकबर म्हणाले की, आज तुमच्यापुढील समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि पंतप्रधान आवास योजनेतून हक्काची घरे प्राप्त करण्यासाठी आपल्याला सगळ्यांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठीमागे उभे राहावे लागेल. मला केवळ विश्वासच नाही तर ठाम खात्री आहे की तुमचे अमूल्य मत तुमच्यासाठी विकास, उत्कर्ष आणि उज्वल भविष्य घेऊन येईल.

या प्रचार दौऱ्यामध्ये सय्यद अकबर यांच्या समवेत नाविद पटेल, मस्तफा पटेल, मेहराज शेख आधी पदाधिकाऱ्यांसमवेत शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# बालाजी सिम्फनीमधील सर्व सोसायट्यांचा आमदार प्रशांत ठाकूर यांना जाहीर पाठिंबा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आकुर्ली-सुकापूर येथे असलेल्या बालाजी सिम्फनीमधील सर्व १० हौसिंग सोसायट्यांनी भाजप महायुतीचे उमेदवार कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांना आपला बिनशर्त पाठिंबा रविवारी (दि.१७) जाहीर केला.

या वेळी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर, सोसायटीचे पदाधिकारी व प्रतिनिधी, भाजपचे तालुका सरचिटणीस भुपेंद्र पाटील, तालुका चिटणीस यतिन पाटील, आकुर्लीचे सरपंच सचिन पाटील, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा नेते राजेश पाटील, दीवेश भगत आदी उपस्थित होते.

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी सातत्याने पनवेलच्या विकासावर भर दिला. त्याचबरोबरीने सामाजिक दायित्व म्हणून त्यांनी समाजकार्यातही स्वतःला झोकून दिले. त्यामुळे पुन्हा हक्काचा लोकप्रतिनिधी म्हणून आमदार प्रशांत ठाकूर हेच विजयी झाले पाहिजेत, यासाठी त्यांना विविध संस्था, संघटनेचा पाठिंबा मिळत असून आज बालाजी सिम्फनीमधील सर्व सोसायटींनी जाहीर पाठिंबा देत आमदार प्रशांत ठाकूर यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचा संकल्पही केला.





## नागरिकांशी संवाद





**खारघर :** महायुतीचे पनवेल विधानसभा मतदारसंघातील उमेदवार व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी खारघर सेंट्रल पार्क तसेच खांदा कॉलनी येथे मॉर्निंग वॉकच्या अनुषंगाने नागरिकांशी संवाद साधला. आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेहमीच सामाजिक बांधिलकी जपली असून सर्व समाजातील व्यक्तींशी सलोखा जपलेला आहे. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत होऊन समर्थन मिळत आहे. या वेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, साजिद पटेल, संतोष शर्मा, विनोद घरत, गीता चौधरी, अभिषेक भोपी, मोतीलाल कोळी आदी उपस्थित होते.

# नील हॉस्पिटल येथे गर्भसंस्कार शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डिवाईन संस्कार रिसर्च फाउंडेशन ट्रस्टतर्फे, नील हॉस्पिटल येथे रविवारी (दि.१७) मोफत गर्भसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले, अनेक गर्भवती महिलांनी या गर्भसंस्कार शिबिराचा लाभ घेतला.

प्रसिद्ध स्त्रीरोग व गर्भ संस्कार तज्ञ बीके डॉ. शुभदा नील यांनी गर्भवती महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले व मेडिटेशन करवून घेतले. मेडिटेशनद्वारा गर्भवती महिलांचा ताणतणाव दूर होवून त्या आनंदी राहण्यास मदत होते. गर्भवती माता व बाळ स्वस्थ, खुश राहतात. रोज गर्भवती महिलांनी व्यायाम, प्राणायाम व मेडिटेशन करावे जेणे करून नॉर्मल डिलिव्हरी होण्यास मदत होते असे वक्तव्य त्यांनी केले.

बाळ चरित्रवान, बुद्धिवान व गुणवान होण्यासाठीसुद्धा त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या मोफत गर्भसंस्कार शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गर्भवती महिलांनी घ्यावा, असे आवाहन डॉ. शुभदा नील यांनी शिबिरादरम्यान केले.



# ‘रोटरी’तर्फे हरित सोसायटी मेळावा

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि रोटरी क्लब ऑफ नवी मुंबई सनराइज, रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल सनराइज यांच्या सहकार्याने ग्रीन सोसायटी मेळावा, रिजन्सी क्रेस्ट, खारघर येथे आयोजित करण्यात आला.









या मेळावाचा उद्देश हरित समाजाची किफायतशीरपणे अंमलबजावणी कस करणे. हरित समाजाची किफायतशीरपणे अंमलबजावणी कस करणे. मुख्य अतिथी माजी डिस्ट्रिक्ट गवर्नर आरटीऐन डॉ. शैलेश पालेकर, महानगरपालिकेचे उपायुक्त वैभव विधाते, अध्यक्ष आरटीऐन शैलेश पटेल, आरटीऐन दीपा पटेल आणि आरटीऐन केशव ताम्हणकर यांच्या हस्ते ग्रीन मीटचे उद्घाटन करण्यात आले.

डॉ. शैलेश पालेकर यांनी उपस्थितांना प्रेरक भाषण केले व हरित समाजाची किफायतशीरपणे अंमलबजावणी कस करणे याची पूर्णपणे माहिती दिली. त्यानंतर उपायुक्त वैभव विधाते त्यांनी पनवेल महानगरपालिकेने विविध हरित पद्धती राबवून दिलेल्या प्रोत्साहनाचा उल्लेख केला. आरटीएन केशव ताम्हणकर यांनीही रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ ने ग्रीन सोसायटी आणि ग्रीन स्कूल बनवण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल थोडक्यात माहिती दिली.

हरित सभेनंतर संतोष ललवाणी यांचे सोलर रूफ टॉप, शैलेश देशपांडे - जलसंवर्धन आणि समजुक्ता मोकाशी यांनी सोसायटीद्वारे अवलंबल्या जाणाऱ्या कचरा व्यवस्थापन पद्धती या विषयावर सादरीकरण केले.

# निजामपूरला महायुतीची जाहीर सभा

## बहुजन समाजाचे हित साधणे आवश्यक -खासदार तटकरे




**माणगाव : प्रतिनिधी**

महाड विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आमदार भरत गोगावले यांच्या प्रचारार्थ माणगाव तालुक्यातील निजामपूर येथे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर सभा झाली. या सभेला हजारोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

या वेळी बोलताना खासदार सुनील तटकरे यांनी बहुजन समाजाचे व्यापक हित साधण्यासाठी तुम्ही सत्तेत असणे आवश्यक असल्याचे सांगितले, तर आमदार भरत गोगावले यांनी महाड विधानसभा मतदारसंघातून मला चौथ्यांदा रेकॉर्ड ब्रेक मतदान होईल, याची खात्री असल्याचा विश्वास व्यक्त केला.

महाड विधानसभा मतदारसंघाची सार्वत्रिक निवडणूक येत्या २० नोव्हेंबर रोजी होत आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने महायुतीचे उमेदवार आमदार भरत गोगावले यांच्या प्रचारार्थ खासदार सुनील तटकरे यांची जाहीर सभा निजामपूर येथे विराट जनसमुदायाच्या साक्षीने पार पडली. या सभेत उपस्थितांना खासदाार तटकरे यांनी मार्गदर्शन केले.

या सभेला शिवसेनेचे राज्य प्रवक्ते ॲड. राजीव साबळे, शिवसेनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य विकास गोगावले, जिल्हा संपर्क प्रमुख अरुण चाळके, ज्येष्ठ नेते दत्तूशेठ पवार, भाजपचे जेष्ठ नेते संजयआप्पा ढवळे, उपजिल्हा प्रमुख चंद्रकांत कळंबे, निजामपूर सरपंच राजाभाऊ रणपिसे, युवा सेना जिल्हा प्रमुख विपुल उभारे, जिल्हा युवक राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष अंनता महाडिक, उपजिल्हाप्रमुख रमेश मोरे, मनसेचे जिल्हाध्यक्ष देवेंद्र गायकवाड, तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र मानकर, सुधीर पवार, भाजपचे तालुकाध्यक्ष गोविंद कासार, अविनाश नलावडे, लक्ष्मण महाळुंगे, आरपीआयचे रवींद्र जाधव, मंगेश पोळेकर, संतोष पोळेकर, बाळाराम दबडे, माजी सरपंच हमजा जळगावकर, संजय गुळंबे, नितीन पवार, देविका पाबेकर, श्रीमती पवार,राजेश कदम, सचिन मोरे आदींसह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच निजामपूर विभागातून जनसमुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या वेळी मार्गदर्शन करताना खासदार सुनील तटकरे यांनी त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त सोने सापडले. आता मतदानरूपी सोने भरतशेठच्या पारड्यात पडणार असे बोलल्यावर टाळ्यांचा गजर झाला. तटकरे पुढे म्हणाले की, गेल्या ४० वर्षात निजामपुरात अनेक सभा केल्या. आजचा जनसमुदाय पाहता भरतशेठ तुमच्या विजयावर झालेला हा शिक्कामोर्तब आहे. भरतशेठच्या निखळ प्रेमापोटी आपण सर्वजण इतक्या मोठ्या प्रमाणात उपस्थित राहिलात. अनेकांच्या मनात येत होते सुनील तटकरे निजामपूरला येतात की नाही? निजामपूरचा सातबारा कोणाचा नाही तो आमचा आहे. निजामपूर विभागात विविध विकासाची कामे गेल्या पंधरा वर्षात केली आहेत. आम्हाला देश पुढे नेऊन राज्य गतिमान बनवायचं आहे. भरतशेठ तुम्ही स्वतःला कधी शेठ म्हणत नाही, तर जनतेची तुम्ही शेठ आहात. जनता तुमच्याकडे आशेने पाहत असते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची गौरवशाली वाटचाल सुरू आहे. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असताना निजामपूरसारख्या या परिसरात औद्योगिक वसाहत आली पाहिजे यासाठी प्रयत्न करून आज या परिसरातील विळे भागाड येथे औद्योगिक कारखानदारी सुरू आहे. या औद्योगिक वसाहतीत सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी उपलब्ध व्हावी यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहिलो. भरतशेठ आपण या मतदारसंघात विकासकामे केली याची जाणीव मतदारसंघातील जनतेला निश्चितपणे आहे. काम करणारा लोकप्रतिनिधी आपल्याला विधानसभेवर निवडून पाठवायचा असून येत्या २० तारखेला धनुष्यबाण या निशाणीशेजारील बटन दाबून आमदार भरत गोगावले यांना बहूमतांनी विजयी करा, असे आव्हान तटकरे यांनी केले.

या वेळी मार्गदर्शन करताना महायुतीचे उमेदवार आमदार भरत गोगावले म्हणाले की, आजची निजामपूरची ही सभा रेकॉर्ड ब्रेक करणारी आहे. या सभेच्या आयोजनासाठी महायुतीच्या सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली त्याबद्दल त्यांचे ऋण व आभार. या मतदारसंघात आपण अनेक विकासाची कामे केली असून लोकांच्या अडचणींना, प्रसंगाला धावून जात मदत केली आहे. महायुतीच्या सरकारने विकास कामांबरोबरच वैयक्तिक योजनांचा लाभ जनतेला मिळवून दिला आहे. विरोधकांचे या भागात कोणतेही विकासकाम नाही. त्यांचा या भागाशी कधी संपर्क आला नाही. आम्ही रात्रंदिवस जनतेची सेवा करीत असतो. आपला विजय होणारच आहे, पण आपल्याला लेचापेचा विजय नको तर भरभक्कम विजय पाहिजे. यासाठी येत्या २० तारखेला धनुष्यबाण या निशाणीशेजारील बटन दाबून मला विजयी करा, असे आवाहन गोगावले यांनी केले. या जाहीर सभेचे सूत्रसंचालन शिवसेनेचे उपतालुका प्रमुख नितीन पवार यांनी केले.

# यशवंत साबळे मित्र मंडळाचा आमदार महेंद्र थोरवेंना पाठिंबा

**खोपोली : प्रतिनिधी**

महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र थोरवे यांना विविध भागातून दिवसेंदिवस जाहीर पाठिंबा मिळत आहे. येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते यशवंत साबळे व मित्र मंडळाने महेंद्र थोरवे यांना नुकताच बिनशर्थ पाठिंबा घोषित केल्याने थोरवे यांची बाजू बळकट झाल्याचा दावा महायुतीतर्फे करण्यात येत आहे.

या मतदारसंघात यशवंत साबळे त्यांचा पाठिंबा ज्या बाजूने असतात ती बाजू बळकट समजली जाते असे राजकीय वर्तुळात बोलले जाते. त्यामुळे त्यांचा पाठिंबा मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात राजकीय वर्तुळात चढाओढ होत असते. अखेर यशवंत साबळे मित्र मंडळाने आमदार महेंद्र थोरवे यांना आपला पाठिंबा घोषित केला आहे. विद्यमान आमदार थोरवे यांनी या मतदारसंघात महाराष्ट्र शासनातर्फे कोट्यवधी रुपयांचा निधी आणून मोठ्या प्रमाणात विकासाची कामे केली असल्याने तसेच भविष्यातही त्यांचा प्रामाणिक प्रयत्न असणार असल्याने आमच्या मित्र मंडळांनी थोरवे यांना पाठिंबा देण्याचे ठरविले, असे या मंडळाचे अध्यक्ष यशवंत साबळे यांनी प्रसारमाध्यमांची बोलताना सांगितले.

अलीकडेच महाराजा मंगल कार्यालयात आमदार थोरवे यांच्या समवेत मंडळाची झालेल्या बैठकीला अध्यक्ष यशवंत साबळे, माझी नगराध्यक्ष व सकल मराठा समाज राज्य समन्वयक डॉ. सुनील पाटील, माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, भाजप महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, शहराध्यक्ष रमेश रेटरकर, रिपब्लिकन पार्टी आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, प्रमोद महाडिक, ज्येष्ठ माजी नगरसेवक मोहन अवसरमल, संतोष माळकर तसेच भाजपाचे कामगार आघाडी सेलचे प्रमुख सूर्यकांत देशमुख इत्यादीसह महायुतीचे अनेक पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते.



# माथेरानमध्ये मतदान जनजागृतीसाठी रॅली

**माथेरान : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क अधिकार बजावावा आणि मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता माथेरान शहरात शालेय विद्यार्थ्यांच्या वतीने जनजागृती रॅली काढण्यात आली होती.

गव्हाणकर शाळा आणि पालिका शाळेच्या विद्यार्थ्यांनी शहरातील मुख्य बाजारपेठ, संत रोहिदास नगर, कोतवाल नगर, पंचवटी नगर, छत्रपती शिवाजी महाराज नगर तसेच अन्य भागातून



ही रॅली काढली. विद्यार्थ्यांनी बॅनर हातामध्ये घेऊन मतदान करण्याचे आवाहन केले. या वेळी दोन्ही शाळेचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# सुधाकर घारे यांची प्रचार रॅली

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघातील परिवर्तन विकास आघाडीचे उमेदवार सुधाकर घारे यांनी तालुक्यात प्रचार फेरी काढली होती.

पळसदरी येथे स्वामी समर्थ मठातून रॅलीला सुरुवात झाली. या वेळी रेल्वेपट्ट्यात प्रचार करीत घारे यांनी तालुक्याच्या शेवटच्या गावातील हद्दीत जाऊन प्रचार केला. त्यानंतर पाषाणेमार्गे पुढे कळंब, पाथरज जिल्हा परिषद गटात धावता प्रचार केला. दुसऱ्या दिवशी सावेले, कोदिवले, नंतर नेरळ-कळंब रस्त्याने रॅली गेली.

# मुरूड समुद्र किनारी पर्यटकांची गर्दी

**मुरूड : प्रतिनिधी**

गुरू नानक जयंती असल्याने शुक्रवारी सर्वांना सुट्टी होती. याचे औचित्य साधून हजारो पर्यटक शुक्रवारपासूनच काशीद व मुरूड समुद्रकिनारी मोठ्या संख्येने आले होते. शनिवार व रविवारी त्यात भर पडली.

पर्यटकांनी शुक्रवार, शनिवार व रविवार अशा तीन दिवसांच्या सुट्ट्या उपभोगण्यासाठी काशीद व मुरूड समुद्र किनाऱ्याला येणे खूप पसंत केले आहे. काशीद समुद्र किनारी सर्वाधिक पर्यटक येत असतात. त्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूस चारचाकी गाड्यांची मोठी गर्दीच गर्दी होती. यामुळे



येथे वाहतूकसुद्धा मंदावली होती. गाड्यांची मोठी संख्या तसेच रोजच्या रोज जाणारी वाहतूक यामुळे वाहतुकीस मोठी समस्या निर्माण झाली होती.

काशीद येथील ६४ टपऱ्यांमधून पर्यटकांच्या खानपानाची व्यवस्था सांभाळली जाते. त्याचप्रमाणे समुद्रात पोहण्यासाठी विविध कपडेसुद्धा पुरविण्यात येतात. काशीद समुद्र किनारी उंट सफारी, घोडेस्वारी, बनाना रायडींग आदींचा भरपूर आनंद पर्यटकांनी घेतला. या वेळी काशीद येथील सर्व हॉटेल व लॉजिंग हाऊसफुल होती. सलग तीन दिवसांची सुट्टी मिळाल्याने पर्यटकांचा वाढत ओघ वाढून स्थानिकांना चांगला रोजगार उपलब्ध झाला.

या वेळी मुरूड समुद्र किनाऱ्यावरसुद्धा गर्दी पहावयास मिळाली. त्याचप्रमाणे प्रसिद्ध जंजिरा किल्ला पाहाण्यासाठी महाराष्ट्रातील विविध विभागातून मोठ्या संख्येने पर्यटक आले होते. त्यामुळे राजपुरी वाहनतळ येथे वाहनांची गर्दीच गर्दी होती. जंजिरा किल्ला येथील वाहनतळ हाऊसफुल्ल झाल्याने पर्यटकांनी समुद्र किनारी आपल्या असंख्य गाड्या पार्किंग केल्या होत्या.

जंजिरा पर्यटक जलवाहतूक सोसायटीतर्फे सर्व पर्यटकांना शिडांच्या बोटींमधून सुखरूप किल्ल्यावर ने-आण केली जात होती. महाराष्ट्रातील औरंगाबाद, परभणी, पुणे, कल्याण, डोंबिवली आदी भागातून अनेक पर्यटक जंजिरा किल्ला पहाण्यास आले होते. पर्यटकांची संख्या वाढल्याने समुद्र किनारे अगदी तुडुंब भरून गेले होते. सध्या पर्यटनाचा मौसम सुरू झाल्याने येथील स्थानिक हॉटेल व लॉजिंग मालकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# नागोठणे येथे गृहमतदानास प्रतिसाद

**नागोठणे : बातमीदार**

विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने जारी केलेल्या निर्देशानुसार ८५ वर्ष व त्यावरील ज्येष्ठ नागरिक मतदारांसाठी गृहमतदान मोहीम राबविण्यात येत आहे. नागोठण्यातील १० मतदान केंद्रात नाव समाविष्ट असलेल्या वयोवृद्ध मतदारांचे घरबसल्या मतदान घेण्यात आले.

नागोठणे शहरात गृहमतदान प्रक्रियेसाठी एकूण १६ मतदारांनी नाव नोंदणी केली होती. त्यापैकी १५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. पेण मतदारसंघातील पथक क्रमांक १८ने नागोठण्यातील वयोवृद्ध मतदारांच्या घरोघरी जाऊन हे गृहमतदान घेतले.


या वेळी रोहा पं.स.च्या गटविकास अधिकारी तथा झोनल ऑफिसर शुभदा पाटील-कुलकर्णी, नागोठणे सजेचे तलाठी तथा मतदान केंद्राध्यक्ष गणेश विटेकर, ग्रामविकास अधिकारी तथा सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष राकेश टेमघरे, मतदान केंद्र स्तरीय अधिकारी किसन शिर्के, भास्कर घाग व पथकातील इतर कर्मचारी उपस्थित होते.

# तीन हजार पणत्यांनी उजळला उल्हास नदीकाठ

**कर्जत : प्रतिनिधी**

उल्हास नदी निर्मल जल अभियान आणि श्री विठ्ठल संस्थान दहिवली यांच्या संयुक्त विद्यमाने त्रिपुरारी पौर्णिमेच्या निमित्ताने दीपोत्सव आयोजित करण्यात आला होता. या वेळी तीन हजार पणत्या प्रज्वलित करून उल्हास नदीचा काठ उजळून निघाला. या वेळी कर्जतकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उल्हास नदी आणि कर्जतकर यांचे नाते अधिकाधिक दृढ व्हावे यासाठी गेल्या काही वर्षांपासून उल्हास नदीकिनारी जातो. उल्हास नदी निर्मल जल अभियान आणि श्री विठ्ठल संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने दीपोत्सव आयोजित केला होता. यंदा कर्जतमध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या प्रति पंढरपूर-आळंदी येथील घाटावर आणि दहीवली येथील घाटावर दीपोत्सव आयोजित



केला होता.

जिथे जिथे नदी अथवा जलस्रोत होते तिथे मानवाने घरी बांधली आणि नंतर गाव शहरे विकसित झाली, परंतु कालानुरूप अवास्तव मानवी महत्त्वाकांक्षेमुळे नद्यांचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली. ज्या नदीमुळे आपले अस्तित्व उदयास आले तिचाच विसर मानवजातीला पडला आहे. तोच दुरावा कमी करण्यासाठी, माणसांच्या मनात नदीसाठी प्रेम निर्माण व्हावे आणि नदीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी उल्हास नदी निर्मल जल अभियान कटिबद्ध आहे. त्यासाठीच दीपोत्सवसारख्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यामुळे कर्जतला दीपोत्सवाची परंपरा लाभली आहे आणि ती कर्जतकर आणि श्री विठ्ठल संस्थानच्या सहकार्याने अविरत सुरू ठेवण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत, असे उल्हास नदी जल अभियान व विठ्ठल संस्थानच्या वतीने सांगण्यात आले.

कर्जत तालुक्यातील शेकडो नागरिकांनी या दीपोत्सवाला हजेरी लावत या नयनरम्य सोहळ्याचा आस्वाद घेतला. याबरोबरच 'राष्ट्र हित मे मतदान, शत प्रतिशत मतदान' हा संदेश सुरेख रांगोळी काढून देण्यात आला.

उल्हास नदी निर्मल जल अभियानचे समीर सोहोनी, विशाल सुर्वे, मुकुंद भागवत, मिलिंद खंडागळे, लता कुलकर्णी, समीर विद्वांस, माधुरी दिघे, महेंद्र कर्वे, श्री विठ्ठल संस्थांनचे महेंद्र तेरेदेसाई, दीपक आराध्ये उपस्थित होते.

# ते पुन्हा आले तर सर्वप्रथम 'जलयुक्त शिवार' बंद करतील

विधानसभेच्या निवडणुकीसाठी मतदान करताना मतदारांनी खूप विचारपूर्वक मतदान करणे आवश्यक ठरणार आहे. महाविकास आघाडीचे सरकार राज्यात अडीच वर्षे होते त्यांच्या कारभाराचे स्वरूप काय होते, ते महाराष्ट्राने अनुभवले आहे. आधीच्या सरकारच्या अनेक चांगल्या योजना महाविकास आघाडीने बंद केल्या. त्यामुळे राज्याच्या विकासालाच खीळ बसली.

जलयुक्त शिवार ही महाराष्ट्रातील एक गाजलेली योजना. तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ही महत्त्वाकांक्षी योजना सन २०१४मध्ये त्यांनी ही आणली. ही योजना केवळ यशस्वी झाली असे नाही, तर योजनेला लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. शासनाच्या पुढाकाराबरोबरच जलयुक्त शिवार योजनेत मोठ्या प्रमाणात लोकसहभागही होता. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या सेवा संस्थांचा सहभाग हादेखील या योजनेच्या यशातील मोठा घटक ठरला.

**पहिले काम केले स्थगिती देण्याचे....**

राज्याच्या जलसिंचन क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या या योजनेला २०१९मध्ये सत्तेत येताच महाविकास आघाडीने तातडीने स्थगिती दिली.

एवढ्यावरच न थांलता योजनेवर आरोपही केले गेले. केवळ राजकीय दृष्टिकोनातून प्रत्येक गोष्टीकडे बघितले तर विकास कसा थांबू शकतो, हेच महाविकास आघाडीने राज्याला या निर्णयाद्वारे दाखवले

**योजनेचे उद्देश काय होते?**

या योजनेचे उद्देश लक्षात घेतले, तर योजना किती महत्त्वाची होती, ते समजून येते. पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाच्या शिवारातच अडविणे, भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे, राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करणे, शेतीसाठी संरक्षित पाणी आणि पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे, राज्यातील सर्वांना पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करण्याची शाश्वतता निर्माण करणे, ग्रामीण भागातील बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजनांचे पुनरूज्जीवन करून पाणीपुरवठ्यात वाढ करणे, विकेंद्रित पाणीसाठे निर्माण करणे, पाणीसाठवण क्षमता निर्माण करणारी नवीन कामे हाती घेणे, अस्तित्वात असलेल्या आणि निकामी झालेल्या जलस्रोतांची (बंधारे/गावतलाव/पाझर तलाव/सिमेंट बंधारे पाणीसाठवण क्षमता पुनर्स्थापित करणे/वाढविणे, अस्तित्वातील जलस्रोतांमधील गाळ लोकसहभागातून काढून जलस्रोतांचा पाणीसाठा वाढविणे, वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देऊन वृक्ष लागवड करणे, पाण्याच्या ताळेबंधाबाबत जनतेत जाणीव तसेच जागृती निर्माण करणे, शेतीसाठी पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यास प्रोत्साहन तसेच जनजागृती करणे, पाणी अडविणे/जिरविणे बाबत लोकांना प्रोत्साहित करणे, लोकसहभाग वाढविणे, हे या योजनेचे उद्देश होते.

**जलयुक्त शिवार अभियान २.०**

अशा अत्यंत महत्त्वाच्या योजनेला स्थगिती दिली गेली आणि योजना बंद झाली. पुढे राज्यात जून २०२२मध्ये महायुतीचे सरकार आले. महायुती सरकारने आधीच्या सरकारने बंद केलेली योजना पुन्हा कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आणि जलयुक्त शिवार अभियान २.० हा महत्त्वांकाक्षी कार्यक्रम सुरू झाला जानेवारी २०२३पासून जलयुक्त शिवार अभियान २.० राबविण्यात येत आहे. या अभियानाची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. सन २०२३-२४मध्ये या अभियानात एकूण ४९ हजार ५२१ कामे पूर्ण झाली आणि त्या कामांवर ९४७.५४ कोटी रुपयांचा खर्च झाला. लक्षात एवढेच घेऊ या, की सिंचनाच्या क्षेत्रासाठीची एवढी महत्त्वपूर्ण योजना महाविकास आघाडी सरकारने बंद पाडली ती केवळ राजकारण म्हणून. देवेंद्र फडणवीस यांना श्रेय मिळू नये म्हणून महाविकास आघाडी पुन्हा सत्तेत आली तर...? हा विचार करून मतदान करावे लागेल. आपल्याला स्थगिती सरकार हवे आहे की प्रगती सरकार हवे आहे, याचा विचार कराचा लागेल.

**-अभिजित पाटील**

# भारताकडून हॉकीमध्ये चीनचा धुव्वा

**पाटणा : वृत्तसंस्था**

भारतीय महिला हॉकी संघाने आश्चर्यकारक कामगिरी केली. राजगीर हॉकी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात तिने बिहार महिला आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी २०२४च्या साखळी टप्प्यातील शेवटच्या सामन्यात चीनचा ३-० असा पराभव केला. भारतासाठी संगीता कुमार (३२२), सलीमा टेटे (३७२) आणि दीपिका (६०२) यांनी गोल करत विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. या विजयासह भारताने गुणतालिकेत अव्वल स्थान निश्चित केले.



सामन्याबद्दल बोलायचे झाले, तर भारताने सुरूवातीच्या मिनिटापासून आक्रमक सुरूवात केली. सामना सुरू होताच दीपिकाने पेनल्टी कॉर्नर जिंकला, मात्र चीनची गोलरक्षक सुरोंग वूने अप्रतिम बचाव केला. पहिल्या क्वार्टरमध्ये दोन्ही संघांच्या भक्कम बचावामुळे दोघांनाही गोल करण्यात यश आले नाही. दुसऱ्या क्वार्टरमध्ये चीनने काउंटर अटॅकवर गोल करण्याचा प्रयत्न केला, मात्र भारतीय गोलरक्षक बिचूने अप्रतिम बचाव केला. भारताला अनेकवेळा पेनल्टी कॉर्नर मिळाले, पण त्याचा फायदा उठवता आला नाही.

तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारताने गती घेतली. ३२व्या मिनिटाला सुशीलाच्या धारदार पासला संगीता कुमारीने डिफ्लेक्ट केले आणि त्याचे गोलमध्ये रूपांतर करून भारताला आघाडी मिळवून दिली. ५ मिनिटांनंतर प्रीती दुबेने शानदार ड्राईव्ह केल्यानंतर सलीमा टेटेकडे चेंडू पास केला, तिने अचूक समाप्तीसह २-० अशी आघाडी घेतली. शेवटच्या क्वार्टरमध्ये चीनने आक्रमण तीव्र केले, पण भारताच्या बचावात्मक फळीने त्यांना गोल करण्याची संधी दिली नाही.


शेवटच्या मिनिटाला भारताला पेनल्टी कॉर्नर मिळाला, तिथे दीपिकाने अप्रतिम ड्रॅग फ्लिक करत गोल केला आणि भारताला ३-० असा निर्णायक विजय मिळवून दिला.

# महाराष्ट्र ओपन कॅरम चॅलेंजर्स स्पर्धेसाठी १० लाखांची बक्षिसे

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या वतीने दुसऱ्या महाराष्ट्र ओपन कॅरम चॅलेंजर्स ट्रॉफी २०२४-२०२५चे आयोजन दादरच्या शिवाजी पार्क येथील महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट हॉलमध्ये करण्यात आले आहे. पुरुष एकेरी व महिला एकेरी अशा दोन गटात ही स्पर्धा रंगणार आहे.

पुरुष गटातील पहिल्या ३२, तर महिला गटातील पहिल्या १६ विजेत्यांना मिळून एकंदर १० लाखांची रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. पुरुष गटातील विजेत्याला रोख रुपये एक लाख ५० हजार, उपविजेत्याला रोख रुपये एक लाख व तिसऱ्या



क्रमांकासाठीच्या खेळाडूस रोख रुपये ७५ हजारांचे बक्षीस व ट्रॉफी देण्यात येईल, तर महिला गटातील विजेतीला एक लाख, उपविजेतीला ५० हजार व तिसऱ्या क्रमांकासाठीच्या खेळाडूस रोख रुपये ३० हजारांचे ईनाम व ट्रॉफी देण्यात येणार आहे.

पहिल्या फेरीपासून खेळाडूने केलेल्या व्हाईट स्लॅम व ब्लॅक स्लॅमसाठी रोख पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. स्पर्धेतील सर्व खेळाडूंना महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या वतीने गणवेश देण्यात येणार असून बाहेर गावच्या खेळाडूंची निवास, चहापान व दुपारच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. स्पर्धेबाबतची संपूर्ण माहिती प्रवेश अर्जासोबत असलेल्या माहितीपत्रकातन देण्यात आली असून स्पर्धेचा प्रवेश अर्ज महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या www.maharashtracarromassociation.com या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

इच्छुक खेळाडूंनी आपली नावे २० नोव्हेंबरपर्यंत महाराष्ट्र कॅरम असोसिएशनकडे नोंदवावीत, असे आवाहन आहे.

# ऑस्ट्रेलिया संघाची पाकविरुद्ध विजयी आघाडी

## वनडेतील पराभवाची टी-२०मध्ये परतफेड

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलिया विरूद्ध पाकिस्तान संघात तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळली जात आहे. त्यातील दोन सामने खेळले गेले. या दोन्ही सामन्यात ऑस्ट्रेलियाने वर्चस्व गाजवले. ऑस्ट्रेलियाने पहिला सामना २९ धावांनी, तर दुसरा सामना १३ धावांनी जिंकला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने मालिकेत २-० अशी आघाडी घेत मालिका आपल्या खिशात घातली.

दुसरा टी-२० सामना सिडनी क्रिकेट मैदानावर खेळला गेला. पहिला टी-२० सामना जिंकल्यानंतर दुसरा टी-२० सामनाही जिंकण्यात ऑस्ट्रेलियाला यश आले. यासोबतच ही मालिकाही जिंकण्यात संघ यशस्वी ठरला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने वनडे मालिकेतील पराभवाचा बदलाही घेतला आहे. आता शेवटचा टी-२० सामना १८ नोव्हेंबर रोजी निंजा क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाणार आहे.

दुसऱ्या टी२० सामन्याबद्दल बोलायचे झाले, तर ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. ऑस्ट्रेलियाने मर्यादित २० षटकांत नऊ गडी गमावून १४७ धावा केल्या. १४८ धावांचे लक्ष्य ठेवून मैदानात उतरलेल्या पाकिस्तान संघाची अवस्था खूपच खराब झाली. सरतेशेवटी पाकिस्तानचा संपूर्ण संघ १३४ धावांत आटोपला. त्यामुळे ऑस्ट्रेलियाने सामन्यात १३ धावांनी शानदार विजय मिळवला.

# वेस्ट इंडिजने इंग्लंडवर साकारला ऐतिहासिक विजय

## चौथ्या सामन्यात कॅरेबियन संघाकडून २१९ धावांचा यशस्वी पाठलाग

**सेंट लुसिया : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजाच्या संघाने उत्कृष्ट पुनरागमन करत इंग्लंडला पराभवाचा मोठा धक्का दिला. पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिले तीन सामने गमावत विडिंज संघाने मालिका गमावली असली तरी चौथ्या सामन्यात अशी काही कामगिरी केली की इंग्लंडचा संघ अवाक् झाला.



वेस्ट इंडिजने २१९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सलग तीन चेंडूत तीन मोठ्या विकेट गमावूनही १९ षटकांत हा धावांचा डोंगर गाठला आणि सामन्यात विजय मिळवला. यासह वेस्ट इंडिजने सात वर्षे जुना विक्रमही आपल्या नावे केला आहे.

चौथ्या टी-२० सामन्यात इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत पाच विकेट गमावत २१८ धावा केल्या. इंग्लंडचा सलामीवीर फिल सॉल्टने ३५ चेंडूत ५५ धावांची स्फोटक खेळी खेळली, तर मधल्या फळीत जेकब बेथेने वादळी फलंदाजी करत ३२ चेंडूत ६२ धावांची नाबाद खेळी खेळली. याशिवाय कर्णधार जोस बटलरने २३ चेंडूत ३८ धावा केल्या. वेस्ट इंडिजसमोर आता २१९ धावांचे लक्ष्य होते, ज्याचा पाठलाग करताना एव्हिन लुईस आणि शाई होप या दोन्ही सलामीवीरांनी तुफान फटकेबाजी केली. दोघांनी पहिल्या नऊ षटकांत १३६ धावा केल्या, पण यानंतर या सामन्यात अचानक इंग्लंडने पुनरागमन केले.

१०व्या षटकाच्या पहिल्या तीन चेंडूत वेस्ट इंडिजने तीन मोठ्या विकेट गमावल्या. सलामीवीर लुईस प्रथम बाद झाला. त्यानंतर होप आणि नंतर निकोलस पूरन बाद झाले. वेस्ट इंडिजची धावसंख्या बिनबाद १३६ धावा होती, त्यावरून ३ बाद १३६ धावांवर पोहोचली. तीन विकेट्समुळे सामना अचानक फिरल्याने इंग्लंडच्या आशाही उंचावल्या होत्या, पण वेस्ट इंडिजने मात्र आपली कामगिरी सुरू ठेवली.

सलामीवीरांच्या उत्कृष्ट कामगिरीनंतर कॅरेबियन कर्णधार रोव्हमन पॉवेलने संघाचा डाव पुढे नेला. कर्णधाराला रदरफोर्डनेही चांगली साथ देत संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली. वेस्ट इंडिजकडून सलामीवीर लुईसने ३१ चेंडूत सर्वाधिक ६८ धावा, तर दुसरा सलामीवीर होपने २४ चेंडूत ५४ धावा केल्या. कर्णधाराने २३ चेंडूत ३८ धावा केल्या. याशिवाय रदरफोर्ड १७ चेंडूत २९ धावा करून नाबाद परतला.

इंग्लंडने दिलेले २१९ धावांचे लक्ष्य वेस्ट इंडिजने एक षटक आणि पाच गडी गमावून पूर्ण केले. यासह त्यांनी आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये घरच्या मैदानात सर्वात मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करण्याचा सात वर्षांचा जुना विक्रमही मोडला. वेस्ट इंडिजने २०१७मध्ये मायदेशात भारतासमोर १९४ धावांचे लक्ष्य गाठले होते, पण आता वेस्ट इंडिजने पाच बाद २२१ धावा करत २१९ धावांचे लक्ष्य गाठले.

# विराटला भावनिक पद्धतीने दबावात आणले जाऊ शकते

## *मॅकग्राचा ऑस्ट्रेलियन गोलंदाजांना कानमंत्र*

**सिडनी : वृत्तसंस्था**

विराट कोहली सध्या संपूर्ण ऑस्ट्रेलियात चर्चेचा विषय आहे. मीडियापासून ते क्रिकेट तज्ज्ञांपर्यंत सर्वत्र त्याच्या नावाचीच चर्चा आहे. चार वेळा पराभूत झालेल्या ऑस्ट्रेलियाला बॉर्डर-गावसकर करंडक जिंकायचाच आहे. अशा परिस्थितीत विराट कोहलीला रोखणे ऑस्ट्रेलियाला गरजेचे आहे. त्यामुळे संघाचे विविध माजी खेळाडू विराट विरुद्ध आपापले प्लॅन्स सांगत आहेत. आता अनुभवी गोलंदाज ग्लेन मॅकग्रानेही विराट कोहलीवर दबाव आणण्यासाठी उपाय सुचवला आहे.

भारताचा महान फलंदाज सचिन तेंडुलकर याला नाकीनऊ आणणारा गोलंदाज म्हणजे ग्लेन मॅकग्रा. ब्रेट लीनंतर मॅकग्रानेच सचिनला सर्वाधिक वेळा बाद केले आहे. आता त्यानेच ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सला विराटला रोखण्यासाठी कानमंत्र दिला आहे. फॉक्स क्रिकेटवर बोलताना मॅकग्रा म्हणाला की, विराटला भावनिक पद्धतीने दबावात आणले जाऊ शकते.

भारतीय संघ नुकताच न्यूझीलंडविरूद्ध ३-०ने हरला आहे. अशा वेळी त्यांचे सर्वच खेळाडू आताच्या कसोटी मालिकेत सर्व शक्तनिशी उतरतील यात वाद नाही, पण विराट कोहली हा एक भावनिक खेळाडू आहे. खेळात त्याच्या भावना गुंतलेल्या असतात. न्यूझीलंडच्या विरोधात त्याला फारशी चांगली कामगिरी करता आलेली नाही. जर ऑस्ट्रेलियाने त्याला कसोटी मालिकेच्या सुरुवातीच्या दोन-तीन डावात स्वस्तात बाद केले तर त्याच्यावर दबाव वाढेल आणि त्याचा ऑस्ट्रेलियाला खूप फायदा होईल.

विराटसारखे खेळाडू पटकन सावरतात आणि मैदानात धमाका करू शकतात. त्यामुळे त्याला सुरुवातीलाच थोडासा दबावात आणले, तर तो ऑस्ट्रेलियासाठी डोकेदुखी ठरणार नाही, अशा शब्दांत ग्लेन मॅकग्राने विराटविरूद्धचे प्लॅनिंग सांगितले.



### ऑस्ट्रेलियात दमदार कामगिरी

भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज विराट कोहली याच्यासाठी हे वर्ष कसोटीत चांगले राहिलेले नाही. २०२४मध्ये तो अद्यापपर्यंत फक्त सहा कसोटी सामने खेळला, ज्यामध्ये तो केवळ २३च्या सरासरीने धावा करू शकला आहे. अशा स्थितीत त्याच्यावर धावा करण्याचे खूप दडपण आहे, परंतु ऑस्ट्रेलियातील त्याचे आकडे जबरदस्त आहेत. त्याने ऑस्ट्रेलियात १३ सामन्यात ५४च्या सरासरीने १,३५२ धावा केल्या आहेत. या काळात त्याने सहा शतकेही झळकावली आहेत. त्यामुळे प्रत्येक ऑस्ट्रेलिया दौऱ्यात विराटवर चाहत्यांची विशेष नजर असते. या वेळीही ती असेल.

# गांगुलीकडून गौतम गंभीरचे समर्थन



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात २२ नोव्हेंबरपासून पाच कसोटी सामन्यांची बॉर्डर-गावसकर ट्रॉफी खेळली जाणार आहे. या मालिकेला पर्थ येथील पहिल्या सामन्याने सुरुवात आहे. सध्या नुकतीच मायदेशात न्यूझीलंडविरुद्धची कसोटी मालिका गमावल्याने भारतीय संघ आणि कोच गौतम गंभीर दबाव आहे. दरम्यान, या मालिकेला सुरुवात होण्यापूर्वी रिकी पॉन्टिंगने मोठे वक्तव्य केले होते, ज्यावर गंभीरने सडेतोड उत्तर दिल्याने त्याच्यावर टीका होत आहे. अशात सौरव गांगुली त्याच्या समर्थनार्थ पुढे आला आहे.

एका मुलाखतीत सौरव गांगुलीने म्हटले आहे की, गौतम गंभीर जसा आहे तसाच राहील. एकदिवसीय आणि कसोटी मालिका गमावल्यानंतर त्याचे इतक्या लवकर मूल्यमापन करणे योग्य नाही. गांगुली म्हणाला, गंभीरला त्याच्या परिस्थितीत सोडले पाहिजे. तो असाच आहे आणि केकेआरने आयपीएलचे जेतेपद पटकावले होते, तेव्हाही असाच होता.

### एवढ्यात मूल्यमापन नको!

सौरव गांगुली म्हणाला, गंभीरने हे का करू नये? मी जेव्हापासून क्रिकेट पाहत आलो आहे, तेव्हापासून ऑस्ट्रेलियन खेळाडू क्रिकेटबद्दल आपापली मते देत आहेत, मग ते स्टीव्ह वॉ असो, रिकी पॉन्टिंग असो किंवा मॅथ्यू हेडन. गंभीर जे काही बोलला त्यात काहीही चुकीचे नाही. तो लढतो आणि स्पर्धा करतो, म्हणून आपण त्याला संधी दिली पाहिजे. त्याला कोच म्हणून दोन-तीन महिने झाले आहेत. त्यामुळे आपण इतक्यात दोन मालिकेवरून त्याचे मूल्यमापन करणे योग्य नाही आणि त्याला अजून वेळ द्यायला हवा.

# मोहम्मद शमीवर वय लपवल्याचा आरोप

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा स्टार गोलंदाज मोहम्मद शमी जवळपास एका वर्षांच्या कालावधीनंतर दुखापतीतून सावरत क्रिकेटच्या मैदानावर उतरला आहे. शमीने रणजी ट्रॉफी सामन्यात चमकदार कामगिरी करत बंगालच्या विजयात मोठी भूमिका बजावली. तो ऑस्ट्रेलियासाठी रवाना होणार असल्याची चर्चा आहे. दरम्यान, शमी आता नव्या अडचणीत सापडल्याचे दिसत आहे.

एका व्यक्तीने शमीवर फसवणुकीचा आरोप केला आहे. शमीने त्याचे खरे वय लपवले असल्याचा दावा त्याने केला आहे. बीसीसीआयने चौकशी करून कारवाई करण्याची मागणीही या व्यक्तीने केली.

इंदूरमध्ये मध्य प्रदेश आणि बंगाल यांच्यात रणजी करंडक सामना झाला. यादरम्यान शमी सामन्यातील सर्व चार दिवस कोणत्याही अडचणीशिवाय खेळला. त्याने पहिल्या डावात चार विकेट घेतल्या, तर दुसऱ्या डावातही दमदार कामगिरी करत संघाला ११ धावांनी रोमहर्षक विजय मिळवून दिला. मीडिया रिपोर्ट्सनुसार तो बॉर्डर-



गावसकर ट्रॉफीसाठी रोहित शर्माबरोबर ऑस्ट्रेलियाला रवाना होऊ शकतो, पण सध्या शमी वेगळ्याच वादामुळे चर्चेत आला आहे.

मोहम्मद शमीवर पुन्हा एकदा नवीन आरोप करण्यात आला आहे. त्याची पत्नी हसीन जहाँनेही घरगुती हिंसाचार आणि मॅच फिक्सिंगसारखे गंभीर आरोप केले होते, मात्र, बीसीसीआयने त्याला फिक्सिंगप्रकरणी क्लीन चीट दिली. आता त्याच्यावर त्याचे खरे वय लपवल्याचा आरोप आहे. एका व्यक्तीने ड्रायव्हिंग लायसन्सचा फोटो सोशल मीडियावर शेअर केला आहे आणि दावा केला आहे की, हे लायसन्स शमीचे आहे, त्यानुसार त्याचे वय ४२ आहे, तर शमीचे सध्याचे हे ३४ वर्षे आहे.

या दाव्यानंतर ड्रायव्हिंग लायसन्सचा फोटो व्हायरल होत आहे, मात्र हा फोटो व त्यात दिलेली माहिती खरी आहे की ते एडिट करून पोस्ट करण्यात आली आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

### अंडर-१९मध्ये होतात प्रकार

भारतात वयाची फसवणूक केल्याबद्दल खेळाडूंना अनेकदा निलंबित करून बंदी घातली जाते. विशेषत: क्रिकेटमध्ये अनेक क्रिकेटपटूंवर वयाच्या फसवणुकीसाठी अल्प कालावधीसाठी (एक-दोन वर्षे) बंदी घातली जाते. हे प्रामुख्याने अंडर-१९ क्रिकेटमुळे घडते. त्यांच्या राज्याकडून किंवा भारताकडून खेळण्याच्या प्रयत्नात अनेक क्रिकेटपटू स्वतः हून किंवा त्यांच्या पालकांच्या, प्रशिक्षकांच्या प्रभावाखाली येऊन स्व:तचे वय कमी सांगतात. दोनच दिवसांपूर्वी हैदराबादच्या अंडर-१९ संघाच्या कर्णधारासह सहा खेळाडूंवर वयाच्या फसवणुकीसाठी दोन वर्षांची बंदी घालण्यात आली होती.

# चॅम्पियन्स ट्रॉफी भारतात येणार!

**मुंबई : प्रतिनिधी**

आयसीसीने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५च्या आधी ट्रॉफी टूर जारी केली आहे. बीसीसीआयच्या आक्षेपानंतर चॅम्पियन्स ट्रॉफी पाकव्याप्त काश्मीरमध्ये जाणार नाही. आयसीसीने पाकिस्तानचा पीओके प्लॅन रद्द केला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीचा दौरा १६ नोव्हेंबरला इस्लामाबाद येथून सुरू होणार आहे. दौऱ्याचे शेवटचे ठिकाण भारत आहे. यानंतर ट्रॉफी पुन्हा पाकिस्तानात जाईल.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला चॅम्पियन्स ट्रॉफी पाकव्याप्त काश्मिर (पीओके)मध्ये नेण्याची इच्छा होती, मात्र बीसीसीआयच्या आक्षेपानंतर त्यांचे मनसुबे यशस्वी झाले नाही. आता आयसीसीने ट्रॉफी टूरचे नवीन वेळापत्रक जाहीर केले आहे. ही टूर १६ नोव्हेंबरपासून सुरू होऊन २६ जानेवारीपर्यंत चालेल. ट्रॉफी २६ जानेवारीला भारतात राहील.

आयसीसीने चॅम्पियन्स ट्रॉफी टूरचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केलंय. ट्रॉफीचा दौरा १६ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबरदरम्यान पाकिस्तानमध्ये होणार आहे. त्यानंतर ट्रॉफी अबोटाबाद, मुरी, नाथिया गली आणि कराची येथे जाईल. २६ ते २८ नोव्हेंबरपर्यंत अफगाणिस्तानमध्ये राहील. मग ट्रॉफी बांगलादेशमध्ये जाणार आहे. येथे ही ट्रॉफी १० ते १३ डिसेंबरपर्यंत असेल. यानंतर १५ ते २२ डिसेंबरदरम्यान ट्रॉफी दक्षिण आफ्रिकेमध्ये जाणार आहे. ती २५ डिसेंबर ते ५ जानेवारीदरम्यान ऑस्ट्रेलियात राहील. यानंतर ६ ते ११ जानेवारीपर्यंत न्यूझीलंडमध्ये राहणार आहे. ट्रॉफी १२ ते १४ जानेवारीदरम्यान इंग्लंडमध्ये राहील. त्यानंतर ती भारतात पोहचेल.


जीवेत् शरदः शतम्!

मनोज भोईते

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक

शिवाजी अहिरेकर


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com